रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २४८
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, २७ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## रेशन दुकानात केरोसीन वाटपास केंद्र सरकारची मंजुरी



**नवी दिल्ली :** आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा सामना देशातील नागरिकांनाही बसत असून गॅसटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले असून केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील शिधापत्रिकाधारकांना तीन लिटर केरोसीन मिळणार आहे. राज्य सरकारने जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित केले असून मार्च-एप्रिलमध्ये राज्यात केरोसीन वाटप केले जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका आहे त्या प्रत्येक कुटुंबास तीन लिटर केरोसीन मिळणार आहे, तर ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे तेही उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारकदेखील केरोसीन मिळण्यास पात्र असतील असे समजते.

## अंतरंग

खोपोलीत भुयारी गटाराचे काम युद्धपातळीवर/५
यशश्री शिंदे प्रकरणात मदत, शासकीय नोकरी जाहीर/६
क्लासिक पॉवरलिफ्टिंगमध्ये अमृता भगतला रौप्यपदक/८

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा बनले जगातील सर्वात लोकप्रिय नेते

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा जागतिक स्तरावर सर्वाधिक लोकप्रिय नेते म्हणून समोर आले आहेत. अमेरिकेतील डेटा ॲनालिटिक्स संस्था मॉर्निंग कन्सल्टच्या ताज्या सर्वेक्षणानुसार पंतप्रधान मोदींना ६८ टक्के अप्रूव्हल रेटिंग मिळून ते जगातील अव्वल नेत्यांच्या यादीत पहिल्या स्थानावर कायम आहेत.

मॉर्निंग कन्सल्टची ही रेटिंग विविध देशांतील प्रौढ नागरिकांच्या मतांवर आधारित सात दिवसांच्या 'मूव्हिंग ॲव्हरेज' पद्धतीने तयार केली जाते. त्यांनी २ ते ८ मार्चदरम्यान केलेल्या सर्वेक्षणात पंतप्रधान मोदी आपल्या जागतिक समकक्षांपेक्षा मोठ्या फरकाने आघाडीवर असल्याचे दिसून आले. सलग तिसऱ्यांदा सत्तेत असूनही त्यांची लोकप्रियता आणि मजबूत नेतृत्व कायम असल्याचे या क्रमवारीतून स्पष्ट होते, तर दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना या यादीतील टॉप-१० मध्येही स्थान मिळू शकलेले नाही.



पंतप्रधान मोदींनंतर दुसऱ्या स्थानावर स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन आणि दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे-म्युंग यांचा क्रमांक लागतो. या दोघांनाही प्रत्येकी ६२ टक्के अप्रूव्हल रेटिंग मिळाली आहे. तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर अनुक्रमे झेक प्रजासत्ताक आणि अर्जेंटिनाचे नेते असून त्यांना अनुक्रमे ५७ आणि ५६ टक्के अप्रूव्हल रेटिंग मिळाली.

इतर जागतिक नेत्यांबद्दल बोलायचे झाल्यास ब्रिटनचे पंतप्रधान कीअर स्टार्मर यांना २४ टक्के, तर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रों यांना केवळ १७ टक्के अप्रूव्हल रेटिंग मिळाली असून ते यादीत खूप मागे राहिले आहेत.

पंतप्रधान मोदींनी अलीकडेच भारतीय राजकारणात एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांच्या कार्यकाळाचा एकत्रित कालावधी ८,९३१ दिवसांवर पोहला असून ते देशातील सर्वाधिक काळ सेवा देणारे प्रमुख ठरले आहेत.

### क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी रायगडात विशेष अभियान


# ४४४ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने ठोस पाऊल उचलले असून आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण ४४४ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. जिल्ह्याला पूर्णपणे क्षयरोगमुक्त करण्यासाठी १०० दिवसांचे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२३पासून क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यात २०२३ साली ९०, २०२४ साली ३७६ आणि सन २०२५ साली तब्बल ४४४ ग्रामपंचायतील या क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. सध्या दोन हजार ५४९ क्षयरुग्णांवर शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. त्याचप्रमाणे दोन हजार १०१ रुग्णांनी क्षयरोगावर मात करून ते पूर्णपणे बरे झाले आहेत.

जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात एकूण चार हजार ३०८ रुग्णांची नोंद झाली. यापैकी दोन हजार १०२ रुग्णांवर उपचार झाल्यानंतर ते पूर्णपणे बरे झाले आहेत,तर एक हजार ७८८ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. त्याचप्रमाणे जानेवारी ते मार्च २०२६ या तीन



**तालुकानिहाय क्षयरोगमुक्त ग्रामपंचायती**

**अलिबाग ५४, कर्जत २७, महाड ६५, माणगाव ३३, पेण २१, पनवेल ४१, रोहा ३७, श्रीवर्धन २४, उरण २७, खालापूर १८, पोलादपूर २८, सुधागड २४, मुरुड १२, तळा ६, म्हसळा २७.**

महिन्यात ८७९ रुग्णांची नोंद झाली. त्यापैकी ७६१ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. आरोग्य विभागाच्या प्रयत्नांमुळे सन २०२५ साली जिल्ह्यातील तब्बल ४४४ ग्रामपंचायतील या क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. जिल्ह्याला पूर्णपणे क्षयरोगमुक्त करण्यासाठी १०० दिवसांचे विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत विविध क्षेत्रातील व्यक्ती, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कंपन्या निक्षय मित्र बनून क्षयरुग्णांना पोषक आहारही उपलब्ध करून देत आहेत.

नुकतेच जिल्हा विकास यंत्रणा, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून आयोजित मिनी सरस जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री महोत्सवात अलिबाग तालुक्यातील क्षयरोगमुक्त झालेल्या सहाण, चिंचोटी, बेलोशी व पेढांबे या ग्रामपंचायतींनी सुवर्ण प्रमाणपत्र मिळविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

> *क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासन सातत्याने प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यातील ४४४ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या असल्या तरी संपूर्ण जिल्हा क्षयरोगमुक्त करायचा आहे. नागरिकांनीही क्षयरोगाची लक्षणे दिसल्यास त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात तपासणी करून घ्यावी.*
>
> **-डॉ. प्राची नेहुलकर,**
> जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप

# पनवेलमधील रिटघर येथे लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ उत्साहात

## विद्यालयासाठी ४० लाखांची घोषणा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेल तालुक्यातील रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २५) लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ आयोजित करण्यात आला होता. हा समारंभ अत्यंत उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात संपन्न झाला.

या सोहळ्याला संबोधित करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाची भव्यता आणि प्रेम पाहून जे काही काम मी आजवर करत आलो आहे, त्यापेक्षा दुपटीने काम करण्याची नवी स्फूर्ती मला मिळाली आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे मनापासून आभार मानले. याचवेळी त्यांनी विद्यालयाच्या प्रगतीसाठी मोठी घोषणा करताना विद्यालयाचा सभामंडप बांधण्यासाठी आणि फरशी बसवण्यासाठी ४० लाख रुपये देण्यात येतील तसेच गरज भासल्यास आणखीही आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे जाहीर केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, पंचायत समिती सदस्य वर्षा केवारे व राज पाटील, रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगरे, सरपंच सुभाष भोपी, उपसरपंच महेश पाटील, संस्थेचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही.यू. जगताप, लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल कामोठेच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, विलास भोपी, बाळाराम भोपी, संजय पाटील, बळीराम भोपी, नवनाथ भोपी, वंदना भोपी, विष्णू भगत, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भारत भोपी, **(पान २ वर..)**

## निवडक

### आंध्र प्रदेशात भीषण अपघात; १३ जणांचा होरपळून मृत्यू



**मार्कापुरम :** आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यात रायवरमजवळ गुरुवारी (दि.२६) पहाटे एका खासगी बसची डंपरशी भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. ही बस तेलंगणातील निर्मल येथून आंध्र प्रदेशातील नेल्लोरकडे जात होती. बसमध्ये एकूण ३५ प्रवासी होते. त्यापैकी १३ जणांचा मृत्यू, तर २२ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### बांगलादेशमध्ये बस नदीत उलटून २३ जणांचा मृत्यू

**ढाका :** बांगलादेशमध्ये बुधवारी सायंकाळी सुमारे ४० प्रवाशांना घेऊन जाणारी एक बस फेरीबोटीत चढत असताना पद्मा नदीत कोसळून किमान २३ जणांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार प्रवासी ईदची सुट्टी साजरी करून राजधानी ढाकाकडे परतत असताना राजबारी जिल्ह्यातील दौलाडिया टर्मिनल परिसरात हा दुर्दैवी अपघात घडला.

# आमदार महेश बालदी यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे लोकार्पण

■ कल्हे परिसरातील नागरिकांना सुविधा उपलब्ध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून आणि पुढाकाराने तालुक्यात नागरी सुविधांचे जाळे विस्तारत असून नागरिकांना अद्ययावत सेवा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील कल्हे येथे नूतन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र साकारण्यात आले आहे.

या उपकेंद्राच्या प्रशस्त मुख्य इमारतीचे लोकार्पण गुरुवारी (दि.२६) आमदार महेश बालदी यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची प्रमुख उपस्थितीत झाले. हे अद्ययावत केंद्र सुरू झाल्यामुळे स्थानिकांना त्यांच्या परिसरात दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहेत.

लोकार्पण सोहळ्याला पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, सदस्य मयूर शेलार, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, माजी सरपंच सदाशिव वास्कर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा पवार, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. दामोदर मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. उन्नती चव्हाण, अक्षता पाटील यांच्यासह विविध विभागांचे शासकीय अधिकारी, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या समन्वयातून उभे राहिलेले हे आरोग्य उपकेंद्र म्हणजे कल्हे पंचक्रोशीतील विकासकामांचा एक महत्त्वाचा टप्पा असून या सुविधेमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## राज्यात वादळी पावसाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

३० मार्चदरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भातदेखील हवामानात बदल दिसू शकतो. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

# ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे गुरुवारी (दि. २६) पहाटे वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले. त्यांनी महाराष्ट्राच्या विशेष करून मराठ्यांच्या इतिहासावर बरेच लिखाण केले होते.

डॉ. जयसिंगराव हे राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराचे खंदे समर्थक होते. ऐतिहासिक संदर्भ, कादगपत्रे आणि पुराव्यावर आधारित इतिहास लेखनाचा त्यांचा आग्रह होता. गेले काही दिवस त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अखेर गुरुवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.

डॉ. जयसिंगराव यांनी शिवाजी विद्यापीठातून एमए आणि पीएचडी पदवी संपादन केल्यावर तीन दशकांहून अधिक काळ महाविद्यालयांमध्ये अध्यापन केले. त्यांनी महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या निधनाने मराठेशाहीचा इतिहासकार हरपला अशी भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर पंचगंगा घाटावर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. जयसिंगराव यांच्या जाण्याने इतिहासकार, साहित्यिक, राजकारणी आणि सामान्य वाचकांमध्ये शोककळा पसरली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्यासह इतर नेते व लेखकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# आयपीएलचे दुसऱ्या सत्रातील वेळापत्रक जाहीर; चाहत्यांना पर्वणी



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक बोर्डाकडून (बीसीसीआय) यंदाच्या वर्षातील आयपीएलच्या दुसऱ्या सत्रातील वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. यापूर्वी बीसीसीआयने पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक जारी केलेले असून दोनच दिवसांत आयपीएलचा धुरळा उडणार आहे.

२८ मार्च रोजी आयपीएलचा पहिला सामना सनरायजर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर बंगळुरू यांच्यात बंगळुरूतील चेन्नास्वामी स्टेडियमवर रंगणार आहे. स्पर्धेतील दुसऱ्या सत्रातील सामने १३ एप्रिल ते २४ मे या कालावधीत देशातील १२ ठिकाणी खेळविण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात एकूण ५० सामने होणार आहेत. त्यामुळे पुढील दोन महिने क्रिकेट चाहत्यांसाठी मोठी पर्वणी आणि फुल टू मनोरंजन असणार आहे.

### १२ शहरांमध्ये ५० लढती

दुसऱ्या सत्रातील वेळापत्रकानुसार ५० सामने खेळवण्यात येणार आहेत. या लढती १२ शहरांमध्ये होणार आहेत. यामध्ये मुंबई, दिल्ली, बंगळुरू, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, हैदराबाद, लखनऊ, जयपूर, धर्मशाला, रायपूर आणि न्यू चंदीगढ यांचा समावेश आहे. दुसऱ्या सत्रातील सामन्यांना १३ एप्रिलला हैदराबादमध्ये सनरायजर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्या सामन्याने होईल, मात्र सेमीफायनल, फायनलच्या लढती कधी होणार याबाबतचा उल्लेख या वेळापत्रकात नाही.

## राम जन्मला गं सखी...



**मुरुड : मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचा जन्मदिन अर्थात रामनवमी गुरुवारी एकदरा येथील मंदिरात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महिलांनी पाळणा गीत सादर केले. (वृत्त पान ७ वर..)**

# अलिबागमध्ये थकीत वीज देयकांच्या वसुलीसाठी गेलेल्या पथकाला मारहाण

**अलिबाग : प्रतिनिधी**

वीज देयके थकवणाऱ्या ग्राहकांविरोधात महावितरणने वीज देयके वसूली मोहीम सुरू केली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही वीज देयके न भरणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत केला जात आहेत, मात्र या वसुली पथकांना ग्राहकांच्या रोषालाही सामोरे जावे लागत आहे. असेच एक प्रकरण अलिबाग शहरात समोर आले आहे.

वीज वसूली करण्यासाठी गेलेल्या पथकाला मारहाण आणि शिवीगाळी केल्याची बाब मांडवी मोहल्ला परिसरात समोर आली आहे. या प्रकरणी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर दोन आरोपींविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दोघांविरोधात गुन्हा दाखल

महावितरणकडून सध्या राज्यभरात थकीत वीज देयकांच्या वसूलीसाठी व्यापक मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत अलिबाग परिमंडळाचे १२ जणांचे एक पथक बुधवारी मांडवी मोहल्ला परिसरात गेले होते. अख्तातारी जैनुद्दीन चौधरी यांचे ६८ हजार २८० रुपयांचे बिल थकले होते. या थकीत बिलाची वसुली करण्यासाठी पथक गेले असता मुसद्दीक जैनुद्दीक चौधरी यांनी आमच्याकडे पैसे नाहीत सांगून थकीत वीज देयक भरण्यास नकार दिला. पथकाने वीज देयक भरणार नसाल तर नियमानुसार कारवाईचा भाग म्हणून वीजपुरवठा खंडीत करावा लागेल असे सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने मुसद्दीक जैनुद्दीक चौधरी आणि अरफान मुनवर चौधरी यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केली तसेच गलिच्छ शब्दात शिवागाळी केली. या प्रकरणी दोघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# महिला व बालकांच्या पोषणात मोठी सुधारणा करण्याचे लक्ष्य -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन (CIFF) यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी तर्फे चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते.या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून राज्यस्तरावरही तांत्रिक सहाय्य दिले जाणार आहे.

तसेच, CIFF कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १,००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.

पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक सहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाईम निरीक्षण, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.

या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर सिलिंडर वाहतूक करणाऱ्या टेम्पोला आग

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत गुरुवारी सायंकाळी ६ वा सुमारास सिलेंडर वाहतूक करणाऱ्या आयसर टेम्पोला भीषण आग लागल्याची घटना घडली असून महामार्ग पोलिसांच्या सतर्कते मुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरून पुण्याहून मुंबईकडे सिलेंडर घेऊन आयसर टेम्पो मुंबईकडे जात असताना तो बोरघाटातील ढेकू गावाजवळ आला असता टेम्पोच्या टायरला भीषण आग लागली टेम्पोचे लायनर गरम होऊन टायरला आग लागल्याची माहिती मिळाली आहे. ह्या टेम्पोमध्ये गॅसने भरलेले अनेक सिलेंडर होते.

या घटनेची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग वाहतूक पोलिसांना मिळताच ते तात्काळ घटनास्थळी दाखल होत त्यांनी आयआरबी यंत्रणा




आणि अग्निशमन दलाला बोलावून आग विझवल्याने मोठी दुर्घटना टळली आहे, सुदैवाने ही आग टेम्पोला लागली नसल्याने बोरघाट महामार्ग पोलिसांमुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

या घटनेची दखल बोरघाट महामार्ग पोलीस केंद्राचे एपीआय स्वप्नील पाटील यांनी तत्काळ घेत ते घटनास्थळी हजर राहत केमिकल एक्सपर्ट धनंजय गिध यांना बोलावून सिलेंडरची तपासणी केली पुढील कार्यवाही करत आहेत.

मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत किमी ३७ च्या दरम्यान मुंबई लेन वर एका वाहनाला आग लागली असल्याची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दलाचे जवान, बोरघाट मदत केंद्राचे पोलीस व अपघातग्रस्त टीम घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविले टेम्पोला आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्या अगोदर आग विझवल्याने टेम्पोचे काही प्रमाणात नुकसान झाले. टेम्पोचे लायनर गरम झाल्याने ही आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. ही घटना सांय ५. ४५ वा सुमारास घडली.

# फणसाड अभयारण्यातील पक्षीगणना
## २५० हून अधिक प्रजाती आढळल्या



**मुरूड : प्रतिनिधी**

ग्रीन वर्क्स ट्रस्ट मुंबई तर्फे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने शाश्वत सहभाग, पुनर्संचयन आणि वन्यजीव संरक्षणाद्वारे संवर्धन या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र वन विभाग व ठाणे वन्यजीव विभाग यांच्या सहयोगाने मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात २० ते २२ मार्च २०२६ या कालावधीत पक्षी गणना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उलेखनीय बाब अशी की, या कार्यक्रमात १० राज्यांतून ३७ पक्षी निरीक्षकांची निवड करण्यात आली असता विविध क्षेत्रांतीत शिक्षक, जीवन शैली प्रशिक्षक, सरकारी कर्मचारी, कलाकार व विद्यार्थी तसेच २२ स्वयंसेवक व वन्यजीव अभयारण्याच्या १८ कर्मचारी वर्गाचा समावेश होता.

उपवन संरक्षक वन्य जीव ठाणे राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक फणसाड वन्यजीव अभयारण्य मनोहर दिवेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे, ग्रीन वर्क्स ट्रस्ट मुंबईचे निखील भोपाळे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटनाचा सोहळा पार पडला.

पक्षी गणनेसाठी १३ टीम्स तयार करण्यात आल्या होत्या त्यामधे ३ पक्षीनिरीक्षक व अनुक्रमे ग्रीन वर्क्स ट्रस्ट व वनरक्षक विभागाचे एक एक स्वयंसेवक नियुक्त केले होते. या सर्व टीम्सनी फणसाड व आसपास च्या २६ संभाव्य ठिकाणी विविध निवास वर्गामध्ये जसे जंगल, ओहोळ पठारी भागाचा उपयोग करत लाईन ट्रान्सेक्ट पद्धतीने गणना पूर्ण केली.

पक्ष्यांबरोबर सरिसृप, उभयचर, सस्तनप्राणी आणि फुलपाखरांचे ही निरीक्षण नोंदविण्यात आले. या कामी पक्षीगणनेच्या आधी सहभागीं साठी डॉ. निखील भोपाळे व सर्वेश अभ्यंकर यांनी विस्तृत प्रशिक्षण घेतले.

# संत बाळूमामांच्या पालखीचे मुंबईकडे प्रस्थान

**चौक : प्रतिनिधी**

भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीसंत बाळू मामा देवाच्या पालखीचे प्रस्थान मुंबईकडे झाले असून, वाटेत भाविक स्वागत करून दर्शन घेत आहेत.

चेंबूर मुंबई येथे श्रीसंत बाळू मामा देवाचे मोठे मंदिर असून दरवर्षी मूळ स्थान कोल्हापूर आदमापूर येथून श्रीबाळू मामा मंदिरातून भाविक भक्त मोठ्या प्रमाणात ही पालखी घेऊन मुंबईकडे जातात. बाळू मामांची पालखी १८ तारखेला निघाली तिचा मुक्काम रात्री नढाळ येथे होता. २८ तारखेला पालखी घेऊन श्रीसंत बाळू मामा मंदिर चेंबूर येथे पोहचणार आहे. पंचायत मंदिरात राहण्याची आणि प्रसादाची सोय उद्योजक चंदर बावदाने, धनाजी माने आणि संदीप फुलावरे यांनी केली होती.

या पालखी सोहळ्यात महादेव पुजारी, शामराम आळदर, अण्णा पुजारी, प्रमोद शिंगाडे, बिरा बंडगर, राजू झजे, शोभा खांडेकर, लक्ष्मी शिवदास, ॲड. गौरी बावदाणे चंदर बावदाने आदिसह अनेक भावीक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# गोकुळेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार

**अलिबाग : प्रतिनिधी**

तीन वर्षांपूर्वी गोकुळेश्वर तलावाच्या सुशोभिकरणाचे शिवधनुष्य हाती घेतले होते. गेल्या तीन वर्षात येथे उत्तम प्रकारे काम झाले आहे. आता गोकुळेश्वर मंदिराची चांगली वास्तु तयार झाली आहे. यापुढेही वेश्वी ग्रामपंचायतीमधील विकासकामांना निधी कमी पडून दिला नाही, असे आश्वासन आमदार महेंद्र दळवी यांनी दिली.



गोंधळपाडा, वेश्वी, गवळीवाडी, वाडगाव फाटा, राऊतवाडी ग्रामस्थ व वेश्वी ग्रामपंचायतीतर्फे अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध श्री गोकुळेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा आणि गोकुळेश्वर तलाव सुशोभीकरणाचे लोकार्पण बुधवारी आयोजित करण्यात आले होते. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्री गोकुळेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार आणि गोकुळेश्वर तलाव सुशोभीकरणाचे लोकार्पण पार पडले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र दळवी बोलत होते.

लेकमॅन ऑफ इंडिया आनंद मल्लिगवाड, जिल्हा परिषद सदस्या मानसी दळवी, जिल्हा परिषद सदस्य दिलीप भोईर, जिल्हा परिषद सदस्य अमित नाईक, अलिबाग नगरपरिषद बांधकाम समिती सभापती प्रशांत नाईक, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, पंचायत समिती सदस्य जयंत वार्डे, शैलेंद्र पाटील, वेश्वी ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गावडे, ग्रामसेवक नितेश तेलगे, गोकुळेश्वर देवस्थानचे विश्वस्त दिलीप रानडे, संदीप रानडे, राष्ट्रवादीचे नेते चारूहास मगर, आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, माजी सरपंच नारायण वार्डे, वाडगावचे माजी सरपंच जयेंद्र भगत, सुधीर वेंगुर्लेकर, माजी उपसरपंच नंदकुमार कदम, नरेश पडियार, सुनील गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

# उरण येथे श्री राम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**उरण : वार्ताहर**

रामनवमीनिमित्त उरण तालुक्यात सर्वत्र श्री राम जन्मोत्सव गुरुवारी (दि. २६) साजरा करण्यात आला. उरण तालुक्यातील चिरनेर, मोरा, फुंडे, मोरा कोळीवाडा, दिघोडे, पिरकोन, हनुमान कोळीवाडा, ठिकठिकाणी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांनी श्री प्रभू रामचंद्र यांच्या जीवनातील विचार, सांगून संगीतमय कीर्तन केले. उरणकर श्री रामाच्या च्या जयघोषाने मंत्रमुग्ध झाले. उरण तालुक्यातील भक्तांनी श्री रामाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.

सालाबाद प्रमाणे रामनवमीनिमित्त यंदाही उरण बाजार पेठेतील श्री राम मंदिरात गुरुवारी (दि. २६) श्री राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



करण्यात आला, असे श्री राम मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर यांनी सांगितले. कीर्तनात तबलावादक विशाल पाटेकर व हार्मोनियम वर भारत पाटील यांनी साथ दिली. दुपारी १२.३०. वाजता ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांनी श्री प्रभू रामचंद्र यांच्या जीवनातील विचार, आचार या सांगून संगीतमय कीर्तन झाले. उरणकर श्री रामाच्या जयघोषाने मंत्रमुग्ध झाले.

सकाळी११.ते १ वाजता ह.भ.प.सुधीर बाळ (डोंबिवली) यांचे संगीतमय कीर्तन झाले. सकाळी काकड आरती ६ वाजता, सकाळी ७.१५ वाजता आरती, दुपारी १२.४० वाजता श्रीराम जन्म, १२.५० वाजता नाहणी, दुपारी १ वाजता पाळणा, १.१० वाजता आरती, सायंकाळी ५ ते ६ वाजता श्री गुजराती महिला सत्संग मंडळ यांचे भजन, रात्री ९ ते १०.३० वाजे पर्यत पालखी मिरवणूक काढण्यात आली.

पालखी मिरवणूक सोबत श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळ झाली. श्री राम जन्मोत्सवात श्री राम मंदिराचे ट्रस्टी चंद्रकांत ठक्कर, आमदार महेश बालदी, वसंत ठक्कर, कौशिक शाह, सदानंद गायकवाड, निलेश ठक्कर, विक्रम ठक्कर, नगरसेवक राजेश ठाकूर, पालू भिंडे, विक्रम ठक्कर, अजित भिंडे, वसंत ठक्कर, गणेश सेवक, पुरोशोत्तम सेवक, उमाकांत ठक्कर, ईश्वर भाई ठक्कर, विनायक जोशी, मनन पटेल, कामेश्वर भट्ट, पुरोशोत्तम सेवक संजय पारेख पृथ्वीराज जोशी, मनीष रवय्या, चेतन ठक्कर, वसंत ठक्कर, निलेश ठक्कर, कल्पेश ठक्कर, मनीष सोमय्या, दिनेश ठक्कर, स्वाती ठक्कर, किरण ठक्कर, हितेश शाह, विपुल पारेख, राजू माळी, आदींनी सहकार्य केले.

# नवीन पनवेल पोदी क्रमांक २ आदिवासीवाडीत एकविरा माता उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल पोदी क्रमांक २ आदिवासीवाडी येथे आदिशक्ती एकविरा माता उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. गेली १० वर्षे या ठिकाणी या सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमानिमित्त माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्यातर्फे सप्तशतीचा पाठ वाचण्यात आला.

स्वामी समर्थ ग्रुप, मुक्ताई भजन मंडळ, आदिशक्ती एकविरा देवी मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मंदिरात होम करण्यात आला. पालखी काढण्यात आली. या उत्सवाला नगरसेविका प्रियंका कांडपिळे, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, कमलाकर घरत, प्रभा सिन्हा, मेघा



ढमाळ आदींनी भेट दिली. उत्सवाचे आयोजन आदिशक्ती एकविरा देवी देवस्थानतर्फे करण्यात आले होते.

आयोजकांच्या वतीने कार्याध्यक्ष दिपेश म्हसकर, सल्लागार चारूशीला घरत, अध्यक्ष गीता वाघे, उपाध्यक्ष प्रकाश वाघे, सचिव भगवान नाईक, सिताराम वाघे, मारूती वाघे, शरद नाईक, अनंता वाघमारे, बेबीबाई नाईक आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## पनवेलमधील रिटघर येथे लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष शुभचिंतन समारंभ उत्साहात

उपाध्यक्ष रमेश पाटील, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, विष्णू भगत, राजन भगत, गोपीनाथ भोपी, विश्वनाथ भोपी, नवनाथ भोपी, ग्रामपंचायत सदस्या कमळाबाई वाघमारे, नाना चौधरी, पोलीस पाटील दीपक पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.बी. कारंडे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर नव्या जांभळे व रूद्र शेळके या विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली, तर माजी विद्यार्थी यशवंत उलवेकर आणि संजय पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारी प्रभावी भाषणे केली. समारंभात विद्यालयातील सर्व महिला शिक्षिकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे औक्षण करून त्यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयामार्फत मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मानपत्र अर्पण करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृदय सत्कार केला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे व श्री भैरवदेव विद्यालय रिटघरच्या विद्यार्थ्यांनी रामशेठ ठाकूर यांचा जीवनपट नृत्यातून अत्यंत प्रभावीपणे सादर केला. या नृत्याचे दिग्दर्शन व नेपथ्य शिक्षक भोईर, शिक्षिका खुटले व गोंधळी यांनी केले होते. या मंगलसमयी वारकरी संप्रदायातील ७५ जणांना सन्मानपूर्वक भगवद्गीता प्रदान करण्यात आली.

या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी.बी. पाटील, जनरल बॉडी सदस्य व्ही.व्ही. पाटील, संजीवनी म्हात्रे, विविध शाखांमधील मुख्याध्यापक, वारकरी मंडळी, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शिक्षिका गावंड यांनी मानले.

# प्रजापती संस्थेतर्फे जनजागृती अभियान

**पेण : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ रजि. राष्ट्रीय सामाजिक संस्था (एनजीओ) यांच्या जनजागृती अभियानांतर्गत क्षेत्रीय बैठक राधाकृष्ण वाडी, तारांखोप, पेण येथे संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली झाली.


बैठकीत उपस्थित समाजबंधूंना संस्थेचे उद्दिष्टे व कार्यक्रम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली व चर्चा करण्यात आली. संस्थेला अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने तसेच विविध कार्यक्रम जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी संघटनेचा विस्तार करण्यावर भर देत जास्तीत जास्त लोकांनी संस्थेशी जोडले जावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी उपस्थित समाजबंधूंनी स्थानिक प्रश्नांवरही चर्चा केली असून त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांनी संघटनेचे महत्त्व पटवून देताना सांगितले की समाजातील अधिकाधिक लोकांनी संस्थेचे सदस्य व्हावे. संघटना जितकी मोठी आणि मजबूत होईल तितका समाजाला अधिक फायदा होईल. तसेच समाजातील गरीब विद्यार्थी व गरजू बांधवांसाठी संस्था नेहमी पुढाकार घेऊन काम करेल व सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही सांगण्यात आले.

यावेळी पेण तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार राजकुमार प्रजापती यांची पेण इकाईच्या संरक्षकपदी, सूरज प्रजापती यांची अध्यक्षपदी, पंकेश प्रजापती यांची उपाध्यक्षपदी, उमेश प्रजापती यांची सचिवपदी, अनिल प्रजापती यांची उपसचिवपदी तसेच इतर अनेक कार्यकारिणी सदस्यांची नियुक्ती करण्यात आली। या बैठकीस गजेंद्र प्रजापती (राष्ट्रीय मुख्य महासचिव), इंदर प्रजापती (महासचिव, रायगड जिल्हा), राज किशोर प्रजापती (अध्यक्ष, अलीबाग तालुका), दिलीप प्रजापती (अध्यक्ष, कर्जत तालुका) तसेच राजकिशोर प्रजापती, राजकुमार प्रजापती, पंकेश प्रजापती, सूरज प्रजापती, सुशील प्रजापती, स्वामीनाथ प्रजापती, संतोष प्रजापती, उमेश प्रजापती, जगन्नाथ प्रजापती, अजीत प्रजापती, दिलीप प्रजापती, अर्जुन प्रजापती, संदीप प्रजापती, रामसूरत प्रजापती, अरविंद प्रजापती, पप्पू प्रजापती, द्वारिका प्रजापती, नरसिंह प्रजापती, नितेश प्रजापती, अनिल प्रजापती, पवन प्रजापती आणि कमलेश प्रजापती यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दुखवटा

### डॉ. समीर कदम



**कळंबोली** : नवी मुंबईतील वैद्यकीय क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या एमजीएम आरोग्य विद्यापीठाचे प्र.कुलगुरू हार्ट सर्जन डॉ. समीर सुधीर कदम यांचे नुकतेच वयाच्या अवघ्या ४८व्या वर्षी एमजीएम हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. डॉ. समीर कदम यांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी लिंबगाव, नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. समीर सुधीर एमजीएम आरोग्य विद्यापीठाचे प्र कुलगुरू, हार्ट सर्जन होते. एक संवेदनशील प्राध्यापक, एक निष्ठावंत, प्रामाणिक डॉक्टर, एक तज्ज्ञ निपुण हार्ट सर्जन व एमजीएम परिवारातील एक रत्न हरपल हरपल्याची भावना नवी मुंबईतील निष्णांत डॉक्टरांनी व्यक्त केली आहे.

# पनवेलच्या देहरंग जल योजनेला वेग

## जलशुद्धीकरण केंद्र आणि नवीन वाहिनीसाठी निविदा प्रसिद्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पनवेलकरांच्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी महापालिकेने ठोस पावले उचलली असून, देहरंग धरणावर आधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून दीर्घकालीन नियोजनाला सुरुवात करण्यात आली असून, यासाठी मंगळवारी ११५ कोटी रुपयांच्या कामांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.



पनवेल महानगरपालिकेने पाणी संकटावर मात करण्यासाठी देहरंग धरणातून वाढीव पाणीपुरवठा करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला गती दिली आहे. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेचे काम पुढे सरकत असून मंगळवारी महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी यासाठी सुमारे ११५ कोटी ४८ लाख रुपयांच्या खर्चाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली.

देहरंग धरणाची क्षमता ३.१२५ घनलक्ष मीटर असून सध्या दररोज सुमारे १६ दशलक्ष लिटर पाणी शहराला पुरवठा केला जातो. मात्र विद्यमान ५५० मिमी व्यासाच्या जिर्ण जलवाहिनीमुळे पुरवठ्यावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे नवीन प्रस्तावानुसार ११०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येणार असून देहरंग ते पनवेलदरम्यान सुमारे १६.५ किलोमीटर अंतरावर ही व्यवस्था उभारली जाणार आहे.

याचबरोबर धरणाजवळ ७० एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र आणि ९.४० एमएलडी क्षमतेची साठवण टाकी उभारली जाणार आहे. पावसाळ्यात धरणातून वाहून जाणारे पाणी वापरून नवीन पनवेल, कळंबोली व कामोठे या सिडको वसाहतींची तहान भागवण्याचा आराखडा महापालिकेने तयार केला होता.

या आराखड्याला नगर संचालनालयाला मिळणाऱ्या मंजूरीच्या प्रतिक्षेत न राहता महापालिका आयुक्तांनी संबंधित योजनेची अंमलबजावणीच्या हालचाली सुरू केल्या आहेत. दरवर्षी पावसाळ्यानंतर धरण तुडुंब भरत असतानाही पावसाळा व हिवाळ्यात खारघरसारख्या भागात पाणीटंचाई भासते. नवीन जलयोजनेमुळे अतिरिक्त पाणी साठवून ते शहराला पुरवता येण्याचे महापालिकेने नियोजन आहे.

भविष्यात शिलार धरणातून जलबोगद्याद्वारे पाणी देहरंग धरणात आणण्याची योजना देखील विचाराधीन असल्याची माहिती महापालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विलास चव्हाण यांनी दिली. निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्यक्ष कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर १८ महिन्यांत ही कामे होणे अपेक्षित आहे.

# लहुचीवाडी येथे रामनवमीला आदिवासी कुटुंबांना घरगुती मीटर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात श्रीराम नवमीचा उत्सव मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात साजरा होत आहे. यानिमित्त तालुक्यातील लहुचीवाडी येथील श्रीराम मंदिरामध्ये आयोजित धार्मिक कार्यक्रमाला उरणचे आमदार महेश बालदी यांनी भेट देऊन प्रभू श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेऊन उपस्थितांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याचे औचित्य साधून लहुचीवाडीतील २३ आदिवासी कुटुंबांना कर्नाळा ग्रामपंचायतीच्या मागासवर्गीय निधीतून घरगुती वीज मीटर उपलब्ध करून देण्यात आले असून त्याचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, बाळूशेठ पाटील, विद्याधर जोशी, पंचायत समिती सदस्य मयुर शेलार, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, पंचायत समितीचे बीडीओ समीर वाठारकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला परिसरातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक हजर होते.


## निवडक

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** तळोजा एमआयडीसी परिसरातील पेंधर फाट्याजवळील नावडा सर्व्हिस स्टेशन येथे एका भरधाव ट्रकने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात २८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. राजूसिंग रजपूत असे या तरुणाचे नाव असून, हा अपघात घडल्यानंतर ट्रक चालक वाहन सोडून घटनास्थळावरून पसार झाला. राजूसिंग व मुकेशकुमार चौधरी हे दोघे घोट गाव येथे राहतात. ते तळोजा एमआयडीसीतील ध्रुव लॉजिस्टिक्समध्ये कामाला होते. हे दोघे दुचाकीने कल्याण–पनवेल रोडने घरी जाताना हा अपघात झाला.

### करंजाडेमध्ये वाहनांना आग

**पनवेल :** करंजाडे परिसरात पहाटेच्या सुमारास वाहनांना आग लागल्याची घटना घडली. सेक्टर ६, राज हिल्स सोसायटी, करंजाडे, पनवेल येथे ही घटना घडली. या आगीत मोटरसायकल, स्कूटर आणि सायकल अशी वाहने जळाली आहेत. आगीची माहिती मिळताच नागरिकांनी तत्काळ सतर्कता दाखवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.



# शिवाजीनगर येथे रामनवमी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीराम नवमीचे औचित्य साधून शिवाजी नगर येथील प्रभू श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी श्रीरामाची मनोभावे आरती करून दर्शन घेतले आणि परिसरातील सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली.

या वेळी कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, रविशेठ पाटील, पनवेल पंचायत समितीच्या आजी सदस्या रत्नप्रभा घरत, योगीता भगत, अखिलेश यादव, स्वप्नील ठाकूर, प्रतिक ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांसह अनेक मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.





## सायबर चोरट्याचा दोघांना गंडा

**पनवेल :** गॅस बिल अपडेट करण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी कामोठे येथे राहणाऱ्या दोघांना तब्बल चार लाख ४६ हजारांना लुबाडल्याचे उघडकीस आले आहे. या दोन्ही घटना कामोठे परिसरात घडल्या आहेत. पहिल्या घटनेत सायबर चोरट्याने एक लिंक पाठवून कामोठे सेक्टर– १८ मधील श्री गणेश सोसायटीत राहणारे आशुतोष पाटील यांच्या खात्यातून दोन लाख दोन हजार रुपये तर ओमशिवम रेसिडेन्सीमध्ये राहणारे पवन सिंग हीच लिक पाठवून त्यांच्या खात्यांतून गुगल पे व फोन पेद्वारे एकूण दोन लाख ४४ हजार रुपये काढून त्यांची फसवणूक केली.

# उरणमध्ये पाण्याचा अपव्यय

## अनेक ठिकाणी छोट्या पाईपलाईन फुटून पाणी वाया



**उरण : बातमीदार**

उरण नगर पालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत असल्याचे अनेक ठिकाणी पाहवयास मिळत आहे.शहरातील काही भागात पाण्याचे कारंजे उडत असून पाणी वाया जात असल्याचे दिसून येत आहे. तसेच गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर केला जात असल्याचे दिसून आले आहे.

उरण नगर पालिका क्षेत्रात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून त्यात वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची गरज वाढली आहे, परंतु पाण्याचे स्रोत कमी आहेत. रानसई धरण आणि पुनाडे धरण हे दोन प्रमुख पाण्याचे स्रोत आहेत, परंतु त्यांची क्षमता कमी होत आहे.

नागरिकां म्हणतात की, पाण्याची अपव्यय होत असल्याचे अनेक वेळा पालिकेला कळवले आहे, परंतु अद्यापही कोणतीही कारवाई झालेली नाही. उरण नगर पालिकेचे अधिकारी म्हणतात की, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आणि पाण्याची बचत करण्यासाठी कारवाई केली जाईल. पाण्याचे कारंजे उडून पाणी फुकट वाया जात असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.



**पनवेल : श्री राम कोळी समाज गव्हाण गावातील १५० वर्षे जुना वारसा असलेली परंपरा म्हणजे गावातील रामनवमी उत्सव. या उत्सवानिमित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण गावातील राममंदिरात प्रभू श्री रामांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, गणपत देशमुख, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, गोपीनाथ कोळी, किशोर मनोहर कोळी, जिज्ञासा कोळी, काशिनाथ कोळी, किशोर कोळी, विशाल कोळी, राजकिरण कोळी, किरण कोळी, रोशन कोळी, विनायक कोळी, मयूर कोळी आदी उपस्थित होते.**

# पनवेलच्या ‘इतना सन्नाटा क्यू है भाई?’ नाटकाला सलग चार पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत २८वा सांस्कृतिक कलादर्पण २०२६ अंतर्गत आयोजित मराठी प्रायोगिक नाट्य महोत्सवात रायगड जिल्ह्यातून पनवेलच्या इतना सन्नाटा क्यू है भाई? या नाटकाने उल्लेखनीय कामगिरी करत सलग चार पुरस्कार पटकावले आहेत.



या नाटकाची निर्मिती दीपक मिराणी यांनी केली असून, स्पर्धेतील पहिल्या सहामध्ये जिल्ह्यातून एकमेव नामांकन मिळवण्याबरोबरच या यशाने नाट्यवर्तुळात विशेष दखल घेतली आहे. यापूर्वीही या नाटकाने महाराष्ट्र राज्य शासनाच्या हौशी नाट्य स्पर्धेत प्रथमच सहभाग घेत तीन पुरस्कार मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली होती.

या यशामागे लेखक व दिग्दर्शक संकेत गायकवाड, रिफ्लेक्शन थिएटरचे संस्थापक व व्यवस्थापक मृण्मय काणे, सोशल मीडिया मार्केटिंग हेड प्रसाद हनुमंते तसेच संपूर्ण टीमची मेहनत महत्त्वाची ठरली आहे. तसेच मिडिया पार्टनर म्हणून दैनिक युवक आधार यांचेही सहकार्य मोलाचे ठरले. रिफ्लेक्शन थिएटर संस्थेला अल्पावधीतच मिळालेले हे यश उल्लेखनीय मानले जात आहे. सांस्कृतिक कलादर्पण गौरव रजनी पुरस्कार २०२६ अंतर्गत या नाटकाला “लक्षवेधी नाटक” म्हणून गौरविण्यात आले आहे. तसेच, सर्वोत्कृष्ट अभिनेता पंकज पुकळे, अभिनेत्री अनया पिंगळे, नेपथ्य सिद्धेश नांदलस्कर अशा मानाच्या पुरस्कारांनी नाटकाच्या यशात आणखी भर घातली आहे.

सांस्कृतिक कलादर्पण गौरव रजनी पुरस्कार सोहळा येत्या २८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी श्रीनिवास नार्वेकर, प्रकाश जाधव, प्रभाकर सावंत, रमेश मोरे यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

# एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा पनवेल पं.स.कडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारकडून जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्चपासून १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी गर्भाशयाचा कर्करोग प्रतिभात्मक एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. पनवेल ग्रामीण भागात एकूण २६२७ लाभार्थी निश्चित करण्यात आले असून या मोहिमेच्या अंमलबजावणीचा आढावा नुकताच पनवेल पंचायत समितीत घेण्यात आला.



या बैठकीस सभापती रंजना वास्कर, जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे, माजी सरपंच सदाशिव वास्कर, भाजप गुळसुंदे विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी उपस्थित होते.

तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत केवळ पाच लाभार्थींनाच लसीकरण करण्यात आले असून या बाबतीत आरोग्य विभागाची उदासीनता स्पष्टपणे दिसून आली. अपेक्षित गतीने लसीकरण न झाल्याबद्दल बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली.

यावेळी सभापती रंजना वास्कर यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना तातडीने गावोगावी जाऊन जनजागृती करण्याचे तसेच पालकांमध्ये लसीकरणाबाबत विश्वास निर्माण करण्याचे निर्देश दिले.

# पनवेलमध्ये ४ एप्रिल रोजी खुशरंग संगीत महोत्सव

## दिग्गज कलाकारांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि नादब्रह्म साधना मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ४ एप्रिल रोजी पनवेलमध्ये भव्य ‘खुशरंग’ संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत रसिकांसाठी ही एक पर्वणी ठरणार असून शास्त्रीय संगीत, भजन आणि कथक नृत्याचा संगम या महोत्सवात अनुभवायला मिळणार आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायंकाळी रंगणाऱ्या या महोत्सवात अनेक नामवंत व अनुभवी कलाकार कला सादर करणार आहेत. या महोत्सवात किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. फिरोज दस्तुर यांचे शिष्य पं. गिरीश संजगिरी, पं. पी.व्हि. कडलास्कर व पं. शंकर अभ्यंकर यांचे शिष्य पं. महेश कुलकर्णी यांचे गायन, त्यांनतर विनायक ललित व तनुश्री जोग यांचे गायन, पं. भाई गायतोंडे यांचे शिष्य पं. विनायक नाईक यांच्या संकल्पनेतून साकारलेला कथक नृत्य कलाविष्कार कार्यक्रम डॉ. वैशाली दुधे यांच्या शिष्या आर्या महाजन व ऋतुजा कुलकर्णी सादर करतील.

समारोप उस्ताद अस्लम खान(खुशरंग), उस्ताद अजीम खान, भजनसम्राट हभप निवृत्तीबुवा चौधरी व पं. शुभदाताई पराडकर यांचे शिष्य पं. उमेश चौधरी यांच्या गायनाने होणार आहे. कलाकारांना संवादिनी संगत विनायक ललित व स्मिता मनोहर; तबला साथ पं. महेश कान्होले, प्रसाद सुतार, विनायक नाईक, भक्ती जाधव, सुधींद्र बागल; पखवाज साथ सोमदत्त माने; सहवाद्य साथ जगदिश म्हात्रे तर निवेदन सोपान आढाव करणार आहेत. या महोत्सवाचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वसंतशेठ पाटील, विनोद तोडेकर, अक्षय चौधरी, अनिल कोळी यांनी केले आहे.









**पनवेल : रामनवमीनिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शिवकर, उमरोली, चिंचवली, कोंडले, हरिग्राम, कानपोली आणि नेवाळी या गावांमध्ये आयोजित कार्यक्रमांना भेट दिली. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ज्येष्ठ नेते एकनाथ देशेकर, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, योगेश लहाने, सागर मढवी, विश्वास काथारा आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# गंभीर दखल हवी

स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी 'आयक्यूएअर'ने प्रसिद्ध केलेल्या 'वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट २०२५'नुसार पाकिस्तान हा जगातील सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे, पण भारतही या यादीत सहाव्या क्रमांकावर आहे. बांगलादेश (दुसरा), ताजिकिस्तान (तिसरा), चाड (चौथा) आणि काँगो (पाचवा) हे देश पाकिस्तान आणि भारत यांच्या दरम्यान या यादीत दिसतात. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असलेल्या भारतासाठी या देशांच्या सोबत या यादीत नाव असणे नक्कीच भूषणावह नाही.

**आपल्याकडे हवा प्रदूषणाची समस्या किती गंभीर स्वरूप धारण करत चालली आहे हे लक्षात येण्यासाठी खरे तर आता कोणत्याही जागतिक अहवालाची गरजच नाही, इतके वरचेवर आपल्याकडचे हवा प्रदूषण चक्क नजरेलाही दिसते. दिल्लीतील भयावह हवा प्रदूषणामुळे दर हिवाळ्यात तिथे शाळा आणि ऑफिसांना सुट्या देऊन लोकांना घरी बसवावे लागते. तेथील लहान मुलांच्या फुप्फुसांच्या कार्यक्षमतेवर दीर्घकालीन नकारात्मक परिणाम होतो आहे असे डॉक्टर मंडळी पुन्हा पुन्हा सांगत आहेत. अन्य महानगरांमधील हवेच्या दर्जाची परिस्थितीही फारशी बरी नाहीच. संपूर्ण देशातच हवेचा दर्जा बऱ्यापैकी खालावल्याचेही समोर आले आहे. पण अजुनही आपण आवश्यक त्या गांभीर्याने या समस्येची दखल घेतलेली नाही. जागतिक अशांतता आणि अस्थैर्य अशा वातावरणात अशा कायमस्वरूपी प्रश्नांकडे लक्ष जाणे मुश्किलच. खेरीज हवा प्रदूषणासारख्या समस्येवर चटदिशी उपायही काढता येत नाही. त्याकरिता अनेक स्तरांवर बरेच काही बदलावे लागते. मुख्यतः हवेचा दर्जा चांगला राखणे याला प्राधान्यक्रमात स्थान द्यावे लागते. त्याकरिता विकासाविषयीच्या दृष्टिकोनात मोठा बदल आवश्यक ठरेल. हवेचा दर्जा खालावणे ही आजच्या घडीला फक्त भारतापुढील समस्या नाही. संपूर्ण दक्षिण आशियात आज या समस्येने गंभीर स्वरूप धारण केलेले दिसते. वाढत्या शहरीकरणामुळे जगभरालाच ही समस्या भेडसावते आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशातही झपाट्याने शहरीकरण वाढत चालले आहे. महाराष्ट्रात तर हे मोठ्या वेगाने घडते आहे. वाहनांची संख्या अफाट वाढत चालली आहे. हवेचे प्रदूषण वाढवण्यात वाहनांमधून सोडल्या जाणाऱ्या धुराचा वाटा सर्वात मोठा असल्याचे मानले जाते. परंतु तरीही आपल्यापैकी फारसे कुणीही खाजगी वाहनांचा वापर कमीत कमी कसा करता येईल याचा विचार करताना दिसत नाही. सरकारी पातळीवरून वाहतुकीचे सार्वजनिक पर्याय वाढवण्याचे प्रयत्न जोमाने सुरु आहेत. पण हे पर्याय उपलब्ध करण्यासाठी ज्या मोठ्या स्तरावर विकासकामे करावी लागतात त्यातूनही हवेचे प्रदूषण वाढतेच. सध्या मुंबई-ठाण्यात ठिकठिकाणी सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांच्या बांधकामांमुळे हवा प्रदूषणात भर पडतेच आहे. शिवाय अशी कामे सुरू असल्याने रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होऊनही प्रदूषण आणखी वाढते. पण हे टाळणार तरी कसे? इमारतींचा पुनर्विकास, नवीन बांधकामे या साऱ्यांमुळे मुंबईत नजरेला दिसण्याइतके हवा प्रदूषण वाढले आहे. अन्य भागांमध्ये शेतात जाळले जाणारे पाचट, वीजकेंद्रांतून जाळला जाणारा कोळसा, कचरा जाळण्यातून होणारे प्रदूषण आदी कारणे असतात. यापैकी कुठल्याच घटकाला अटकाव करणे सोपे नाही. कदाचित त्यामुळेच आपण सारे आहे ती परिस्थिती स्वीकारून हवा प्रूदषणाच्या समस्येकडे पाठ फिरवतो. पण प्रदूषणातून निर्माण होणाऱ्या आरोग्यसमस्यांकडे व कमी होणाऱ्या आयुर्मानाकडे डॉक्टर पुन्हा पुन्हा लक्ष वेधत आहेत. त्यामुळेच सर्व स्तरांवर या समस्येची दखल घेण्याची नितांत गरज आहे.**

# राजिपमध्ये विरोधी पक्षनेत्याची परंपरा खंडित होणार?

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा परिषदेत (राजिप) अखेर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांची महायुतीची सत्तेत आली आहे. या तीन पक्षांखेरीज शिवसेना ठाकरे गटदेखील या महायुतीसोबत आहे. काँग्रेसचे दोन सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे राजिपमध्ये विरोधी पक्षनेताच नसेल. विरोधी पक्षनेता नसणे हे राजिपच्या इतिहासात प्रथमच घडेल. राजिपमधील विरोधी पक्षनेत्याची परंपरा खंडित होण्याची चिन्हे आहेत.

रायगड जिल्ह्याचे राजकारण गूढ आहे असे म्हटले जाते. अनेकदा याचा प्रत्यय आला आहे. यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीतदेखील हे दिसून आले. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात बहुतांशी ठिकाणी निवडणूकपूर्व युती होती. भाजपचे १५, राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, तर शिवसेनेचे २१ सदस्य निवडून आले. सत्तास्थापनेसाठी ३० सदस्य हवेत. भाजप आणि राष्ट्रवादीचे २१ सदस्य निवडून आले होते. ही युती सत्तेत येईल हे नक्की होते, तर २१ सदस्य असलेली शिवसेना सत्तेच्या बाहेर राहील असे बोलले जात होते. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या सदस्यांना जवळजवळ एक महिना गोव्यात ठेवले, पण अचानक चक्र फिरली.

शिवसेनेला सोबत घेऊन महायुतीने सत्ता स्थापन केली. भाजपचे मंगेश वाकडीकर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर पाटील उपाध्यक्ष झाले. शिवसेनेचे चंद्रकांत कळंबे, रसिका केणी, भाजपचे गटनेते वैकुंठ पाटील आणि राष्ट्रवादीचे नारायण डामसे सभापती झाले. महिला व बालविकास समिती सभापतीपदी रसिका केणी, तर समाजकल्याण समितीपदी नारायण डामसे यांची निवड करण्यात येणार आली. अन्य दोन सभापतींच्या खात्याचे वाटप होणे बाकी आहे. उर्वरित विषय समित्यांचे वाटप ७ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. आता राजिपमध्ये महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. शुक्रवारी (दि. २७) राजिपचा मूळ अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

दीड वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटात जोरदार संघर्ष सुरू होता. याच वादामुळे पालकमंत्रिपदाचा तिढाही सुटू शकला नाही. अशाही परिस्थितीत जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेच्या निमित्ताने महायुतीमधील तिन्ही पक्ष पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. शेवटच्या क्षणी तिन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी हस्तक्षेप करून रायगड जिल्हा परिषदेत शिंदेच्या शिवसेनेला सोबत घेऊन सत्ता स्थापन करण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेत महायुतीची सत्ता स्थापन झाली. आणि रायगड जिल्ह्यात गेल्या दीड वर्षापासून सुरू असलेल्या वादावर पडदा पडला. त्यामुळे दोन्ही पक्षांतील कटुता जिल्हा परिषदेतील सत्तेच्या निमित्ताने कमी झाल्याचे पहिल्यांदाच पहायला मिळाले.

राजिपमध्ये महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. शिवसेना ठाकरे गट राष्ट्रवादी काँग्रेससोबत आहे. काँग्रेसचे केवळ दोन सदस्य निवडून आले आहेत. जिल्हा परिषद कायद्यानुसार विरोधी पक्षनेता हे पद नाही, परंतु राजिपमध्ये विरोधी पक्षनेत्याची परंपरा आहे. विरोधी पक्षातील ज्यांचे जास्त सदस्य आहेत त्यांपैकी एकाची विरोधी पक्षनेता म्हणून निवड केली जाते. विरोधी पक्षनेत्यांना वेगळे दालन असते.

राजिपमध्ये कोणत्याही पक्षाची सत्ता असली तरी विरोधी पक्षदेखील तितकाच प्रभावीपणे काम करायचा. आता विरोधकच राहिलेला नाही. काँग्रेसकडे संख्याबळ नाही. त्यामुळे त्यांना विरोधी पक्षनेतेपद मिळण्याची शक्यता नाही. परिणामी रायगड जिल्हा परिषदेत विरोधी पक्षनेता निवडण्याची परंपरा खंडित होण्याची शक्यता आहे.

# वैद्यकीय क्षेत्राला दिशा देणारी पल्स परिषद

महाराष्ट्राने आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांप्रमाणेच वैद्यकीय सेवेतही आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आधुनिक वैद्यकीय शिक्षण, अत्याधुनिक रुग्णालये, संशोधन संस्था आणि कुशल डॉक्टर यांच्या बळावर राज्य देशाच्या वैद्यकीय व्यवस्थेत अग्रस्थानी आहे. या क्षमतेला जागतिक स्तरावर अधोरेखित करण्यासाठी २७ व २८ मार्च रोजी 'पल्स-२०२६' पल्स प्लॅटफॉर्म फॉर युनिफाइड लर्निंग, स्किल्स, हेल्थ अँड एज्युकेशन ही महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार असून राज्यात वैद्यकीय क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण परिषद ठरणार आहे.

राज्यातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील वैद्यकीय व्यवस्था सक्षम आणि तंत्रज्ञानाधारित केल्याशिवाय राज्याचा सर्वांगीण विकास शक्य नाही. राज्याची वैद्यकीय व्यवस्था अधिक आधुनिक, तंत्रज्ञानसज्ज, संशोधनप्रधान आणि सर्वसमावेशक करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परिषदेत वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी, अधिष्ठाता, विशेषतज्ज्ञ, खाजगी शैक्षणिक संस्था तसेच आधुनिक वैद्यकीय उपकरणे उत्पादक कंपन्या सहभागी होणार आहेत. राज्याच्या मेडिकल टूरिझम आणि ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेचा दर्जा सुधारणे यासाठी या परिषदेची भूमिका महत्वाची ठरेल.

राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पुढाकारातून आयोजित होणारी ही परिषद वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा व्यवस्थापन आणि वैद्यकीय पर्यटन यांना एकत्र आणणारा व्यापक मंच आहे. या परिषदेत देश-विदेशातील नामवंत डॉक्टर, संशोधक, वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्रातील धोरणनिर्माते तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. आधुनिक वैद्यकीय व्यवस्थेतील आव्हाने आणि त्यावरील उपाय यावर सखोल चर्चा होण्यासाठी हे एक व्यासपीठ ठरेल.

वैद्यकीय सेवा ही केवळ उपचारांपुरती मर्यादित नसून ती आर्थिक प्रगतीची मोठी संधीही ठरू शकते. जागतिक स्तरावर 'मेडिकल टुरिझम' म्हणजेच वैद्यकीय पर्यटनाचा वेगाने विस्तार होत आहे. कमी खर्चात दर्जेदार उपचार मिळण्याच्या दृष्टीने भारत आणि विशेषतः महाराष्ट्राकडे अनेक देशांचे लक्ष वेधले जात आहे. 'पल्स-२०२६' परिषद ही संधी अधिक प्रभावीपणे मांडण्याचे काम करणार आहे. महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण संस्था, सुपर-स्पेशालिटी रुग्णालये आणि संशोधन केंद्रांची मोठी संख्या आहे. या क्षमतेचा उपयोग करून राज्याला जागतिक वैद्यकीय सेवेत एक प्रभावी केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परिषदेकरिता जगभरातून २९०० पेक्षा जास्त तज्ञ, जवळपास १३० नामांकित डॉक्टर्स, वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक संशोधक येणार आहेत. या परिषदेत वगेवेगळी २० सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

राज्य वैद्यकीय क्षेत्रात अग्रगण्य असून देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, उद्योगपती आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी होणार आहेत. त्यांच्या सहभागामुळे नवीन तंत्रज्ञान, आधुनिक उपचारपद्धती आणि मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक राज्यात येण्यास मदत होईल. याचा थेट फायदा रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्यात, डॉक्टरांना नवीन संधी उपलब्ध होण्यात आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळण्यात होणार आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळणे, आयुष क्षेत्रात आयुर्वेद आणि ॲलोपॅथी यांच्यात समन्वय साधून एकात्मिक वैद्यकीय व्यवस्था निर्माण करणे, फार्मसी क्षेत्रातील नवीन संशोधन, डॉक्टरांचे संशोधन पेपर आणि नवकल्पना यांचे सादरीकरणही परिषदेत होणार आहे.

'पल्स २०२६' परिषदेमार्फत महाराष्ट्राला वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. 'महाराष्ट्र ब्रँड' म्हणून वैद्यकीय पर्यटनाची ओळख निर्माण करण्यासाठी राज्यातील रुग्णालये, वेलनेस केंद्रे, संशोधन संस्था आणि पर्यटन क्षेत्र यांच्यात समन्वय निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे राज्यात वैद्यकीय सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय उपकरणे, जैवतंत्रज्ञान, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि संशोधन यांसारख्या क्षेत्रांना नवी चालना मिळणार आहे. याचा थेट परिणाम रोजगारनिर्मितीवरही होईल.

**-वर्षा फडके आंधळे,**
**उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



## बदलते तंत्रज्ञान

### थेट अर्ध्या किंमतीत खरेदी करा सॅमसंग गॅलेक्सी एस २४

सॅमसंग गॅलेक्सी एस २४ खूप कमी किमतीत खरेदी करण्याची संधी आहे. हा फ्लॅगशिप सॅमसंगफोन त्याच्या लॉन्च किमतीच्या जवळपास निम्म्या किमतीत उपलब्ध आहे.



२०२४ मध्ये लॉन्च झालेल्या या फोनची किंमत ३५००० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली. हा सॅमसंग फोन ई-कॉमर्स वेबसाइट ॲमेझॉनवर मोठ्या सवलती आणि बँक ऑफर्ससह उपलब्ध आहे.

हा सॅमसंग फोन ७४ हजार ९९९ रुपये सुरुवातीच्या किमतीत लॉन्च झाला होता, परंतु आता हा फोन ४३ हजार ९९९ च्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध आहे. या फोनच्या खरेदीवर ॲमेझॉन एक हजार ५००ची बँक सवलत देत आहेत. त्यामुळे हा फोन ४१ हजार ४९९च्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध होईल.

सॅमसंग गॅलेक्सी एस २४ : डिस्प्ले आणि स्टोरेज

हा सॅमसंग फोन ६.२ इंचाच्या 2x डायनॅमिक आयलँड डिस्प्लेसह येतो. हा डिस्प्ले १२०Hz रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो. या फोनमध्ये पंच-होल डिझाइन आणि इन-डिस्प्ले फिंगरप्रिंट सेन्सर आहे. हा फोन क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८ जनरेशन ३ प्रोसेसरवर चालतो. यात ८ जीबीपर्यंत रॅम आणि २५६ जीबीपर्यंत इंटरनल स्टोरेज आहे.

सॅमसंग गॅलेक्सी एस २४ : कॅमेरा

या फोनमध्ये मागील बाजूस ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे. फोनमध्ये ५० मेगापिक्सेलसचा मुख्य OIS कॅमेरा, त्यानंतर १२ मेगापिक्सेलचा अल्ट्रा-वाइड आणि ५ मेगापिक्सेलचा मॅक्रो कॅमेरा आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी, या फोनमध्ये १२ मेगापिक्सेलचा कॅमेरा आहे.

सॅमसंग गॅलेक्सी एस २४ :
बॅटरी आणि सेक्युरिटी अपडेट्स

सॅमसंग गॅलेक्सी एस २४मध्ये ४००० mAh बॅटरी असून हा फोन २५ वॅट फास्ट चार्जिंगला सपोर्ट करतो. हा फोन अँड्रॉइड १४वर आधारित OneUI ऑपरेटिंग सिस्टमसह येतो. कंपनी या फोनसाठी सहा वर्षांपर्यंत सेक्युरिटी अपडेट्स देते. हा फ्लॅगशिप सॅमसंगफोन त्याच्या लॉन्च किमतीच्या जवळपास निम्म्या किमतीत उपलब्ध आहे.

# अभिनेते व गायक भार्गवराम आचरेकर



**निमित्त**

मराठी संगीत रंगभूमीवरील गायक-नट म्हणून गाजलेल्या भार्गवराम भिकाजी आचरेकरांचा जन्म कोकणातील मालवण तालुक्यातील आचरे या गावी झाला. भार्गवरामांचा १९२५च्या आसपास ललित कलादर्शमध्ये प्रवेश झाला. या कंपनीत त्यांचे संगीत व अभिनयाचे शिक्षण सुरू झाले. सुरुवातीला ते छोट्या-मोठ्या स्त्री-भूमिका व इतर कामेही करत. ललितकलादर्शच्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त लेख..

भार्गवराम यांनी ललितकलेत बारा वर्षे काढली. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा', 'पुण्यप्रभाव', 'कृष्णार्जुन युद्ध', 'शिक्का कट्यार', 'सोन्याचा कळस', 'वधूपरीक्षा' इत्यादी ललितकलादर्शच्या नाटकांतून त्यांनी विविध भूमिका केल्या. त्यांना १९३७ साली कंपनीच्या दुरवस्थेमुळे पेंढारकरांनीच गावी जायला सांगितले. त्यांनी १९४०-४१ च्या सुमारास स्वतःची 'ललितकला संवर्धक' ही कंपनी काढली. भार्गवरामांनी या कंपनीच्या 'संगीत सौभद्र'(कृष्ण), 'मानापमान' (धैर्यधर), 'पुण्यप्रभाव' (भूपाल) या नाटकांतून पुरुष-भूमिकाही समर्थपणे साकारल्या. आर्थिक जम न बसल्यामुळे ही कंपनीही बंद करावी लागली.


पुढे गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीच्या नाटकांतूनही त्यांनी भूमिका केल्या. त्यांच्या 'विद्याहरण' या नाटकातील कच, 'प्रेमसंन्यास'मधील जयंत, 'सौभद्र'मधील अर्जुन या भूमिका विशेष गाजल्या. याच दरम्यान भार्गवराम विवाहबद्ध झाले व पुण्यात स्थायिक झाले. दामुअण्णा मालवणकरांच्या 'प्रभाकर नाट्यमंदिर', तसेच 'भारत नाट्यकला' या काही नाट्यसंस्थांतूनही भार्गवरामांनी काम केले. भार्गवरामांनी जुन्या नाटकांबरोबरच 'लग्नाची बेडी' (पराग), 'उसना नवरा' (गिरीश) अशा काही नव्या नाटकांमधूनही भूमिका केल्या.

नाटकाबरोबरच शास्त्रीय संगीताच्या बैठका, गायनाच्या शिकवण्या, आकाशवाणीवरील कार्यक्रम असे उपक्रम चालू होते. जुन्या नाटकांचा जमाना संपत आला होता. नव्या संगीत नाटकांचे युग सुरू झाले. 'नाट्यसंपदा'चे १९६७ साली 'कट्यार काळजात घुसली' हे संगीत नाटक आले. या नाटकाद्वारे भार्गवराम आचरेकरांचे वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर पुनरागमन झाले. या नाटकात त्यांनी पं. भानुप्रसादचे काम केले. अतिशय छोटी भूमिका असली तरी भार्गवरामांचे काम आणि गाणे प्रेक्षकांच्या मनावर ठसले. या नाटकातील 'दिन गेले भजनावीण' हे पद व यमनमधील 'तराण्यां'तून त्यांच्या गाण्याचा कस दिसतो. 'कट्यार'च्या जवळजवळ ५०० प्रयोगांतून त्यांनी काम केले. ललितकलादर्शच्या हीरक महोत्सवी वर्षात १९६८ साली 'सौभद्र' या नाटकातून त्यांनी श्रीकृष्णाची भूमिका साकारली होती.

भार्गवरावांचा आवाज वजनदार व गाणे कसदार होते. ते सातत्याने गायनाची मेहनत करत. त्यांच्या शिष्यवर्गात अविनाश आगाशे यांचे प्रमुख नाव घ्यावे लागेल. ते बरीच वर्षे त्यांच्याकडे शिकले. याशिवाय मुकुंद उपासनी, मुकुंद मराठे यांनाही त्यांची तालीम मिळाली. अनेकांना नाट्यसंगीताचे, तसेच गायनाचे मार्गदर्शन लाभले.

भार्गवरावांना १९८३ साली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे त्यांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आला. पुणे महानगरपालिकेतर्फे 'बालगंधर्व' पुरस्कार (१९९६); अखिल महाराष्ट्र नाट्य परिषद, सांगलीतर्फे पुरस्कार (१९८९); याशिवाय मराठी रंगभूमी, पुणे; कालनिर्णय, मुंबई व अण्णा कराळे पुरस्कृत 'संगीत सूर्य केशवराव भोसले' पुरस्कार आदी पुरस्कारांचे ते मानकरी होते. वयाच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी पुण्यात त्यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

### सततच्या ऑनलाईन कंटेंटमुळे नकारात्मक मानसिकतेचा त्रास

धकाधकीच्या जीवनशैलीत तणावाशी झुंज देणाऱ्या मुंबईकरांसाठी एक चिंताजनक निष्कर्ष समोर आला आहे. इंटरनेटवर नकारात्मक आशय पाहण्याची सवय मानसिक आरोग्य अधिक बिघडवू शकते, असे नव्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये एका प्रसिद्ध झालेल्या या संशोधनात यावर महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली गेली आहेत.

डेटा मोठ्या प्रमाणावर विश्लेषणाद्वारे करण्यात आलेल्या या अभ्यासानुसार जे लोक सतत निराशाजनक, आक्रमक किंवा वादग्रस्त कंटेंट पाहतात, त्यांच्यात चिंता, नैराश्य आणि तणावाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलेले आढळते. मुंबईसारख्या शहरात लोकल प्रवास, कामाचा ताण आणि सतत मोबाईल वापर यामुळे या परिणामाची तीव्रता अधिक जाणवू शकते.



संशोधनात नमूद केल्याप्रमाणे, हा प्रश्न केवळ स्क्रीन टाइमचा नसून, वापरकर्ते कोणत्या प्रकारचा आशय पाहतात, यावर अधिक अवलंबून आहे. नकारात्मक कंटेंट सतत पाहिल्याने 'फीडबॅक लूप' तयार होतो, ज्यामुळे व्यक्ती अधिकच तणावग्रस्त बनते आणि त्या चक्रातून बाहेर पडणे कठीण होते. डिजिटल वातावरण केवळ वास्तवाचे प्रतिबिंब नसून, ते मानसिक स्थिती घडवण्यात सक्रिय भूमिका बजावते, असे संशोधकांचे मत आहे. मुंबईकरांसह सर्वांनीच डिजिटल वापराबाबत सजग राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

निष्कर्षांमुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स आणि त्यांच्या अल्गोरिद्म्सच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. वादग्रस्त आणि भावनिक कंटेंटला अधिक प्राधान्य दिल्यामुळे वापरकर्त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते प्लॅटफॉर्म मॉडरेशन, अल्गोरिदममध्ये बदल आणि वापरकर्त्यांमध्ये जागरूकता वाढवणे आवश्यक आहे, 'डिजिटल हायजीन' पाळणे, नकारात्मक कंटेंटपासून दूर राहणे, सोशल मीडिया वापर मर्यादित ठेवणे यावरही भर दिला जात आहे. एकंदरीत, ऑनलाइन नकारात्मक आशय हा केवळ विद्यमान समस्यांचे प्रतिबिंब नसून, त्या अधिक गंभीर करण्यास कारणीभूत ठरतो.

हल्ली मोबाइलवर मित्रांच्या ग्रुपवरही राजकीय किंवा अन्य नकारात्मक कंटेंट अधिक येत असल्याने भांडणे, वाद वाढत आहे. जर एखाद्याला माहीत आहे की आपल्याला नैराश्य येते तर त्यांनी आवर्जून निगेटिव्ह कंटेंट बघणे टाळायला हवे. केवळ मोठ्या व्यक्तींवरच नाही तर लहान मुलांवरही निगेटिव्ह कंटेंटचा वाईट परिणाम होऊ शकतो.

# खोपोली भुयारी गटाराचे काम युद्धपातळीवर सुरू

## २५ वर्ष प्रलंबित योजना कार्यान्वित होणार



**खोपोली : प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खोपोली भुयारी गटार योजनेची कामे युद्ध स्तरावर सुरू झाली आहेत. दरम्यान ही कामे होत असताना शहरातील रस्त्यांची पुन्हा खोद काम होऊन रस्त्यांची मात्र दुरवस्था होणार असल्याने, भुयारी गटार पाठोपाठ रस्त्यांची कामे ही मार्गी लागावित, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

जवळपास ८८ कोटी निधी खर्च होऊन खोपोली भुयारी गटार योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. यात पूर्वीची भुयारी योजना पुनर्जीवित करण्यासोबत ही योजना अधिक मजबूत करणे, सर्व रहिवासी भागात भुयारी गटार योजना टाकणे, सांडपाणी निचरा होण्यासाठी नवीन प्रणाली बनवले, शहरातील सर्व सांडपाणी एकत्रित करून, अत्याधुनिक स्वरूपाचा सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया अंमलात आणली जाऊन एसटीपी प्लान्ट उभारणी करण्यात येणार आहे. तसेच शुद्धीकरण करण्यात आलेल्या पाण्याचा बागबगीचा व अन्य वापरासाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे.

योजनेसाठी ८८ कोटी निधी मंजूरीसाठी तत्कालीन नगरविकास मंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी या संदर्भात माहिती देतांना आवर्जून सांगितले. या योजनेसाठी २० टक्के निधी नगरपालिका कडून व ८० टक्के निधी राज्य सरकारच्या शहरी विकास निधीचा माध्यमातून कामांच्या प्रगती नुसार तीन टप्यात उपलब्ध होणार आहे. भुयारी गटार योजना मागील २५ वर्षांपासून रखडलरली बहुचर्चित योजना आहे. ही योजना शहरासाठी मूलभूत सुविधा अंतर्गत अतिशय महत्त्वाची विकास योजना असून नागरिकांसाठी महत्वपूर्ण योजना आहे.

**“ ही योजना यशस्वीपणे अस्तित्वात आल्यावर शहरातील उघडयावर वाहणारे सांडपाणी, गटारी बंद होतील. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा महत्वाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्याचसोबत शहर स्वच्छ राहण्यास मोठी मदत होणार आहे. महत्वाचे म्हणजे या योजनेतंर्गत सांडपाणी प्रक्रिया करून त्याचे पुनर्वापर होणार असल्याने पाताळगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी मोठी मदत होणार आहे.**

**–कुलदीपक शेंडे,**
**नगराध्यक्ष, खोपोली**

# श्रीवर्धन येथे मासळीचा दुष्काळ; नौका किनारी

**श्रीवर्धन : बातमीदार**

दुपारच्या वेळेस उत्तर दिशेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे व आखाती देशातील युद्धजन्य स्थितीमुळे डिझेल दरवाढ झाल्याने मच्छीमार बांधव संकटात आले असल्याचे पाहायला मिळत आहे. सध्या दुपारच्या वेळेस जोरदार वारे सुटत असल्यामुळे मच्छीमारांना आपल्या बोटी मच्छीमारीसाठी समुद्रात घेऊन जाणे कठीण होऊन बसत आहे.

श्रीवर्धन तालुक्याला लाभलेला निसर्गरम्य समुद्रकिनारा व या ठिकाणी असलेली निसर्गरम्य ठिकाणे, यामुळेच या ठिकाणी दिवसेंदिवस पर्यटकांचा ओघ वाढतच आहे. पर्यटक या ठिकाणी येण्याचे मुख्य कारण म्हणजे मच्छी या ठिकाणी मुबलक प्रमाणात मिळते. आखाती देशांमध्ये युद्धजन्य स्थिती निर्माण झाल्यामुळे इंधनाच्या दरामध्येदेखील वाढ झाली आहे.

अनेक मच्छीमारांनी आपल्या बोटी बंदरामध्ये नांगरून ठेवल्याचे पाहायला मिळत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मौजे – बोर्ले, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| १३५ | ०–१५–३०<br>पो.ख. ०–०१–५०<br>एकूण ०–१६–८० | ३.१६ | दुर्योधन पांडूरंग सस्ते |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०२ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २६/०३/२०२६.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मौजे – बोर्ले, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं. / हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३९/२/ब | ०–७१–८०<br>पैकी ०–२७–५०<br>पो.ख. ०–००–१०<br>एकूण ०–२७–६० | ५.७७ | ज्ञानदेव रामा पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०२ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २६/०३/२०२६.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

# कर्जतमध्ये राम नवमी उत्साहात



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अनेक गावांमध्ये श्री राम मंदिरे आहेत. या मंदिरांमध्ये राम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात असंख्य भाविकांनी श्री रामाचे दर्शन घेतले.

तालुक्यातील दहिवली, साळोख, बेंडसे, कडाव, नेवाळी, वेणगाव, माथेरान, नेरळ कर्जत येथील कपालेश्वर मंदिर आदी ठिकाणी राम नवमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहिवली येथील श्री विठ्ठल संस्थांनच्या श्री राम मंदिरातही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्रीराम पंचायतन पंचक्रोशी दैवज्ञ समाज ट्रस्टच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरु असल्याने भालचंद्र घुमरे यांच्या निवासस्थानी श्री राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. ८० वर्षाची परंपरा असलेल्या श्रीराम मंदिरात प्रभू श्रीराम नवमीच्या निमित्ताने भक्तांची गर्दी झाली होती.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क– हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **7 दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वलप, ता. पनवेल, जि. रायगड,**

| गट क्र.व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १३ | बिनशेती ४९ - ०० - ०० | ४९०.०० | मे.बन्सल प्रोपर्टी तर्फे भागीदार राजेश नागरमल बन्सल |
| १४ | बिनशेती २ - ०० - ०० | २०.०० | |

पनवेल.
दिनांक 26/03/2026.

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**

शॉप नं. 13, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर 4, सेक्टर नंबर 5, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९०२२३१७७७२.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८८/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.... इसांबे लेआउटचा विकास... इसांबे गावासाठी तात्पुरत्या स्वरूपात पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे. | ₹ ३९,८४,०००.०० |
| २ | पाताळगंगा येथील जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची देखभाल व दुरूस्ती......पाताळगंगा येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रातील ग्रिल्स बदलणे व व्हॉल्व्हची दुरुस्ती करणे. | ₹ ३९,८८,५००.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील निवासी इमारतींची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील निवासी व अनिवासी इमारतीमधील विद्युत उपकरणांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १५,९८,४८३.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण वाहिनीचा तुटलेला भाग ७१० मि.मी. व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी निःसारण वाहिनीचा पुरवठा करून, टाकणे व जोडणी करून बदलणे. | ₹ ४०,०७,६०५.०० |
| ५ | नागोठाणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... नागोठाणे येथील जलशुद्धीकरण केंद्र, कर्मचारी निवासी कॉलनी परिसरात विकसित केलेल्या लॉन, बाग, झुडपे व वृक्षारोपणाची वार्षिक तत्वार देखभाल करणे. | ₹ २७,३३,५६५.०० |
| ६ | रनसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल आणि दुरुस्ती..... रनसाई पाणीपुरवठा योजनेतील फुल बोर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटर्सची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २४,१५,३६३.०० |
| ७ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती.... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील मान्सूनपूर्व व मान्सून दरम्यान कामे करणे, रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारांची साफसफाई, सीडी वर्कची व उघड्या खोदलेल्या गटारांची साफसफाई इत्यादी कामे करणे. | ₹ ३९,९९,३६७.०० |
| ८ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रानसई जलशुद्धीकरण केंद्राचे परिचालनाकरीता सेवा पुरविणे. | ₹ ३४,५२,९०४.०० |
| ९ | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या शुद्ध जल गुरूत्व वाहिनी सेवा रस्त्यावरील खड्डे बीएम व २० मि.मी. जाडीच्या सील कोटने भरणे. | ₹ ३९,७२,०८९.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २७/०३/२०२६ ते दिनांक १०/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३०/०३/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०२/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

[Shri]

SHREE SAMARTH SOCIAL AND EDUCATIONAL INSTITUTE'S

**SHREE SUVIDYA VIDYALAYA, KAMOTHE**

Self-Finance Govt. Recognised, State Board

Sec. 09, Plot No.: 05, Kamothe
Mobile No. :8097752425
Email ID :- Ssv.kamothe@yahoo.com

**REQUIREMENT OF TEACHERS 2026-2027**

| Sr. No. | Post | Qualification |
|---|---|---|
| 1 | Pre Primary Teacher | H.S.C. /B. Sc/B. Com/ B.A and Diploma in Early Childhood Teaching |
| 2 | Primary | H.S.C. /B. Sc/B. Com/ B.A with D. Ed/B.Ed. (All Subject) |
| 3 | Secondary | B.Sc./B.A / B.Com with B.Ed. (English, Mathematics, SST, Hindi, Marathi and Science &Tech.) |
| 4 | Sport Teacher | B.A / B.Com/ B.Sc. with B. P. Ed. |
| 5 | Art Teacher | ATD |
| 6 | Computer Teacher | B. Sc. (IT/CS) |

**For All Position**

- Fluency in Spoken and Written English with required subject is necessary.
- Minimum One Year experience required.
- Drop or Mail Your Resume along with photocopies of all documents. (Ssv.kamothe@yahoo.com)
- Interested Candidates are requested to apply on before30/03/2026.
- Interview Date :Monday, 6th April 2026 & Tuesday, 7th April 2026.
- Interview Timing :10.00am to 1.00pm

Address:-Shree Suvidya Viayalaya, Sector:- 09, Plot No. :-05,Kamothe, Tal. Panvel, Dist. Raigad 410209

**Cont.: 8097752425 / 8879422816**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ९०/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील **पथदिव्यांची देखभाल** आणि दुरुस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची एक वर्षाच्या कालावधीसाठी **सर्वसमावेशक देखभाल** व दुरुस्ती करणे, ज्यामध्ये गंजलेले, खराब झालेले खांब, फिटिंग्ज, **केबल्स बदलण्याचा समावेश** आहे. -- **(दुसरी मागणी)** | ₹ ४०,००,७४६.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... महाड औद्योगिक क्षेत्रातील ई-झोनमध्ये, भूखंड क्रमांक ई-२७/१ ते ई-१८ दरम्यान, खराब झालेल्या विद्यमान एसी प्रेशर पाईपलाईनच्या जागी ३५५ मि.मी. व्यासाची एचडीपीई पाईपलाईन बसवणे . -- **(दुसरी मागणी)** | ₹ ३९,९३,०३३.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २७/०३/२०२६ ते दिनांक ०६/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३०/०१/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०१/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# मोबाईल हिसकावणारे चोरटे जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली परिसरात मोबाईल हिसकावण्याची घटना घडल्यानंतर नवी मुंबई पोलिस नियंत्रण कक्षाला करण्यात आलेल्या एका तक्रारीमुळे अवघ्या काही मिनिटांत दोन चोरट्यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांच्या तत्परतेमुळे गुन्हेगारांना वेळीच जेरबंद करण्यात आले.

कळंबोली येथील बीमा कॉम्प्लेक्स ते फुडलॅण्डकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर ही घटना घडली. ३६ वर्षीय भंगार व्यावसायिक आपल्या कामानिमित्त या रस्त्याने जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी तरुणांनी त्याला अडवले. या तरुणांनी चाकूचा धाक दाखवून त्याच्याकडील मोबाईल फोन हिसकावून घेतला आणि तेथून पळ काढला. घटनेनंतर घाबरलेल्या व्यावसायिकाने



जवळील इतर व्यावसायिकांना याची माहिती दिली. सुरुवातीला परिसरातील नागरिकांना या घटनेवर विश्वास बसला नाही, मात्र एका व्यावसायिकाने तत्काळ नवी मुंबई पोलिसांच्या ११२ या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती दिली.

नियंत्रण कक्षाला मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयितांचे वर्णन त्वरित कळंबोली पोलीस ठाण्यास पाठविण्यात आले. तसेच परिसरात गस्त घालणाऱ्या बीट मार्शलना सतर्क करण्यात आले. मिळालेल्या वर्णनानुसार पोलिसांनी फुडलॅण्ड कंपनीसमोरील रस्त्यावर संशयित दुचाकीस्वारांची तपासणी सुरू केली. या तपासादरम्यान सकाळी साडेदहा वाजता दोन संशयित तरुणांना ताब्यात घेण्यात आले आणि पुढील चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. दरम्यान, मोबाईल चोरी झालेला व्यावसायिकही तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आला असता त्याने या दोघांना ओळखले.

चौकशीत हे दोघेही भिवंडी येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी सांगितले की, नियंत्रण कक्षाच्या तत्परतेमुळे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक नितिन शिंदे, तृप्ती शेळके, पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगले यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी जलद कारवाई केल्यामुळे आरोपींना लगेच पकडणे शक्य झाल्याची माहिती दिली.

# पनवेलमध्ये निष्काळजी चालकामुळे प्रवासी महिलेचा गंभीर अपघात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल ते साई मार्गावरील राज्य परिवहन बस चालकाच्या निष्काळजीपणामुळे एका ४० वर्षीय महिलेला गंभीर अपघाताला सामोरे जावे लागले. बसचा वेग न कमी करता वळण घेतल्याने महिला बसमधून बाहेर फेकली गेल्याची धक्कादायक घटना पनवेलमध्ये उघडकीस आली आहे. पनवेल ते साई या मार्गावर हा अपघात घडला.

आर्शिया कंपनीजवळील रावे फाटा परिसरात ही घटना घडली असून या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पेण तालुक्यातील




बलवली गावात राहणाऱ्या ३४ वर्षीय महिलेने याबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार महिला आणि तिची ४० वर्षीय जीते गावात राहणारी मैत्रीण या कामानिमित्त पनवेल ते रावे या राज्य परिवहन (एसटी) बसने प्रवास करत होत्या. रावे फाट्याजवळील बसथांब्यावर उतरण्यासाठी त्या बसच्या दरवाज्याजवळ उभ्या होत्या.

यावेळी बसचालकाने बसचा वेग कमी करण्याऐवजी वळणावर भरधाव वेगाने बस चालवली. त्यामुळे बसमधील प्रवाशांचा तोल गेला आणि दरवाज्याजवळ उभी असलेली ४० वर्षीय महिला थेट बसमधून बाहेर फेकली गेली. या अपघातात संबंधित महिलेच्या डोक्याच्या मागील भागाला तसेच हात-पायांना गंभीर दुखापत झाली आहे. तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एसटी बसचालक सिद्धेश्वर महाले याच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# व्यावसायिक गॅसटंचाईदरम्यान अनधिकृत फेरीवाल्यांचा धंदा सुरूच



**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण देशभरात घरगुती तसेच व्यावसायिक गॅसची टंचाई जाणवत असताना अनेक हॉटेल व्यवसायिकांना आपले उद्योग बंद ठेवावे लागत आहेत, मात्र या पार्श्वभूमीवर कोपरखैरणे परिसरात अनधिकृत फेरीवाले बिनधास्तपणे व्यवसाय करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

कोपरखैरणे येथील बोनकोडे गावाजवळील एका ठिकाणी रस्त्यावर अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांकडे व्यावसायिक गॅस सिलेंडर सहज उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे. हे फेरीवाले रात्री उशिरापर्यंत चायनीज, तंदुरी, शिग कबाब यांसारख्या पदार्थांची विक्री करत असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांचा धंदा जोरात सुरू असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये आहे.

विशेष म्हणजे, हे सर्व फेरीवाले परप्रांतीय असून त्यांना व्यावसायिक गॅस सिलेंडर कशा पद्धतीने मिळतात, याबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे कायदेशीर व्यावसायिकांना गॅस मिळत नसताना अनधिकृत विक्रेत्यांना तो सहज उपलब्ध होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, एकीकडे कायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांना गॅस मिळत नाही, तर दुसरीकडे अनधिकृत फेरीवाल्यांना तो सहज उपलब्ध होतो, ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी तात्काळ कारवाई करून अनधिकृत व्यवसाय बंद करावा, अशी मागणी दिव्या दीप फाउंडेशनचे अध्यक्ष प्रदीप म्हात्रे यांनी केली आहे.

# पत्रकार शैलेश चव्हाण यांना जीवे मारण्याची धमकी

## पत्रकार संघटनांकडून तीव्र निषेध

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली परिसरातील जुन्या झुडिओ मॉलजवळ स्थानिक पत्रकार शैलेश श्यामसुंदर चव्हाण यांना जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शैलेश चव्हाण हे लक्ष्मी ग्रुप अँड डेव्हलपर्सच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर मित्रांसोबत गाडीत बसले होते. यावेळी बांधकाम व्यावसायिक वाजिद शेख हा बाहेर येऊन चव्हाण यांच्या गाडीचे फोटो काढू लागला. "फोटो का काढला?" असा जाब विचारण्यासाठी चव्हाण खाली उतरले असता वाजिद शेख याने संतापून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. चव्हाण यांनी याबाबत विचारणा केली असता आरोपीने "जास्त बोललास तर गाडीखाली चिरडून टाकेन" अशी थेट जीवे मारण्याची



धमकी दिली. तसेच आई-बहिणींवरून अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न केला. याचवेळी आरोपीचा वडील घटनास्थळी येऊन चव्हाण यांची कॉलर पकडत "तुला काय करायचे ते करून घे" अशी धमकी देत तेथून निघून गेले.

दरम्यान, चव्हाण यांनी आपण स्थानिक पत्रकार असल्याचे सांगत शांततेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यानंतर आरोपी वाजिद शेख हा आपल्या बीएमडब्ल्यू कारमधून घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरात राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार मोठ्या संख्येने जमा झाले. कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र दोन तास उलटूनही आरोपी हजर न झाल्याने अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

या प्रकरणी पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंदवला असला तरी घटनेची गंभीरता लक्षात घेता तातडीने दखलपात्र गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी पनवेलमधील पत्रकार संघटनांनी केली आहे. दरम्यान, रायगड प्रेस क्लब, पनवेल प्रेस क्लब तसेच पत्रकार हल्ला कृती समिती यांनी या घटनेचा जाहीर निषेध नोंदवला आहे.

# उरण-पनवेल मार्गावर मोठी दुर्घटना टळली

## पुलाचा लोखंडी सांगाडा कोसळल्याने वाहतूक काही काळ ठप्प

**उरण : बातमीदार**

उरण-पनवेल महामार्गावरील चिर्ले जवळील नागाव फाटा येथे बुधवारी सकाळी १०:३० च्या सुमारास उड्डाणपुलाच्या कामासाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी सपोर्ट स्ट्रक्चरला एका भरधाव ट्रेलरने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे पुलाचा जड लोखंडी सांगाडा थेट रस्त्यावर कोसळला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी उरण परिसरातील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती.

चिर्ले (नागाव) येथे सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. या कामासाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी सांगाड्याला एका ट्रेलरने जोराची धडक दिली. धडक इतकी जोरात होती की लोखंडी स्ट्रक्चर थेट रस्त्याच्या मधोमध पडल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. मिळालेल्या माहितीनुसार ट्रेलर चालकाने एटीएम मधून पैसे काढण्यासाठी गाडी उभी केली होती, परंतु हॅन्ड ब्रेक निसटल्याने अवजड ट्रेलर उतारावरून पुढे सरकला आणि थेट पुलाच्या लोखंडी बांधकामात शिरला चालकाचा ताबा नसलेला हा ट्रेलर वेगाने धडकल्याने हा अपघात घडला. या धडकेत ट्रेलर चा एक्सेल बार तुटून मोठे नुकसान झाले आहे आणि पुलाचे लोखंडी स्ट्रक्चर कोसळल्याने वाहतुकीची कोंडी झाली.

घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले आहे. निष्काळजीपणे वाहन चालवल्याप्रकरणी त्याच्यावर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. महामार्ग प्राधिकरणाने क्रेनच्या साहाय्याने पडलेले लोखंडी खांब बाजूला केले असून, आता हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला करण्यात आला आहे. उरण आणि पनवेलच्या दिशेने जाणारी वाहतूक आता सुरळीत सुरू आहे.

या घटनेबाबत माहिती देताना उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एच डी मुलाणी म्हणाले की, अपघात घडल्यानंतर तातडीने आमचे पथक घटनास्थळी पोहोचले. ट्रेलर चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात घडला असून चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान निष्काळजीपणे वाहन चालवल्या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# तळोजा पोलिसांनी १०० मिसिंग मोबाईल मूळ मालकांना केले परत



**पनवेल : वार्ताहर**

सीईआयआर पोर्टलचा वापर करून १६ लाख ३७ हजार रुपये किंमतीचे १०० मिसिंग मोबाईल तळोजा पोलिसांनी मूळ मालकांना परत केले आहेत.

वरिष्ठांनी सीईआयआर पोर्टलचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील मिसिंग मोबाईल शोधण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तळोजा पोलीस ठाण्यात ०१/०६/२०२५ ते २४/०३/२०२६ दरम्यान विशेष मोहीम राबवून १६,३७,००० रुपये किमतीचे १०० मिसिंग मोबाईल हस्तगत केले असून तक्रारदार यांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले आहेत.

ही कामगीरी तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिसांनी केली आहे.

# घणसोलीत डेकोरेटर्सच्या सामानाला आग

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली सेक्टर १६ येथील एका मोकळ्या भूखंडावर ठेवलेल्या मंडप डेकोरेटर्सच्या सामानाला गुरुवारी (दि. २६) दुपारी भीषण आग लागली. या आगीत डेकोरेटर्सचे साहित्य मोठ्या प्रमाणावर जळून खाक झाले असून आगीची झळ बाजूला उभ्या असलेल्या वाहनांनाही बसली आहे.

सुदैवाने अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांनी वेळीच धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

सेक्टर १६ मधील १२.५० टक्के योजनेंतर्गत असलेल्या एका भूखंडावर ही आग लागली. हा भूखंड गेल्या अनेक वर्ष वापराविना पडून होता. ही जागा सध्या समाधान डेकोरेटर्स यांना भाड्याने देण्यात आली होती.

# विजय आर्मी स्कूलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिखले येथील विजय आर्मी स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी प्रवेश सुरू झाले आहेत.

विजय आर्मी स्कूल ही सैनिकी शाळा असून फक्त मुलांसाठी आहे. येथे महाराष्ट्र स्टेट अभ्यासक्रम आहे व शिकवण्याचे माध्यम सेमी इंग्लिश असेल. अनिवासी विद्यार्थ्यांसाठीही प्रवेशाची सोय आहे. सहावीसाठी प्रवेश सुरू झाले आहेत आणि खुल्या आणि ओबीसी संवर्गासाठी इयत्ता सातवी ते दहावी काही रिक्त जागांसाठी काही प्रवेश शिल्लक आहेत. अकरावी आणि बारावीसाठी विज्ञान शाखेसाठीही ऑफलाईन प्रवेश नोंद प्रक्रिया सुरू आहे.

शाळेत मुलांसाठी स्वतंत्र खोल्या, आधुनिक सोयी आणि सुविधा उपलब्ध आहेत. इयत्ता सहावी आणि सातवीसाठी निवडपूर्व प्रवेश परीक्षा ५ एप्रिल रविवारी सकाळी १० वाजता विजय आर्मी स्कूल चिखले येथेच होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. प्रवेशासाठी Https://forms.gle/०Q६wck८JpBujsv४E९ ही लिंक आहे. अधिक माहितीसाठी ९७३०६८३७४८, ९३५९२६०३३७, ९८६७१२१९६२ येथे संपर्क साधावा. मार्गदर्शनासाठी शाळेचे कमांडंट पी.व्ही.आर क्रिष्णन यांना भेटावे.

# यशश्री शिंदे प्रकरणात आठ लाख मदत आणि शासकीय नोकरी जाहीर

**उरण : बातमीदार**

उरणमध्ये यशश्री शिंदे हत्येनंतर केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासमवेत आरपीआय नेते प्रकाश मोरे, नरेंद्र गायकवाड व रायगड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते व स्थानिक आरपीआय नेते संजय गायकवाड यांनी पीडितेच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यावेळी कुटुंबाची परिस्थिती पाहून त्यांनी शासकीय नोकरी व आर्थिक मदत देण्याची घोषणा केली होती.

दिलेला शब्द पाळत पीडित कुटुंबाला सुमारे ८ लाखांची आर्थिक मदत तसेच शासकीय नोकरी लाभार्थी मानून अनुष्का शिंदे हिला देण्यात आली आहे. सदर नोकरीचे परिपत्रक रामदास आठवले यांच्या उपस्थितीत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २० मार्च २०२६ रोजी 'चवदार तळे सत्याग्रह दिना'च्या औचित्याने विजयस्तंभ येथे नोकरीचे परिपत्रक प्रदान करण्यात आले.

पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे नेते रामदास आठवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका अध्यक्ष संजय गायकवाड व स्थानिक कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने कुटुंबियांनी आभार मानले.

या नोकरीसाठी जिल्हाधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. तसेच प्रकरणातील आरोपीविरुद्ध फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी उरण आरपीआयने केली आहे.

# महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

उमेद अभियान आणि लखपती दिदी या उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळत आहे. 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन', उमेद मॉल आणि उमेद मार्ट सारख्या संकल्पनांमुळे ग्रामीण भागातील बचत गटाच्या महिलांनी तयार तयार केलेल्या उत्पादनांना शहरी बाजारपेठ उपलब्ध होत असून, त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळत असून, मुंबई आणि नवी मुंबईच्या जनतेने महालक्ष्मी सरसला भेट देऊन बचतगटातील उत्पादीत वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. आज नवी मुंबईतील वाशी एक्झीबीशन सेंटर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शन-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाव्दारे २४ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत ग्रामीण भागातून आलेल्या बचतगटांच्यावतीने तयार करण्यात आलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, गृहउपयोगी साधन सामग्रीच्या विक्रीचे प्रदर्शन असलेल्या राज्यस्तरीय 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६'चे उद्घाटन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर सुजाता सुरज पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सलुजा सुतार, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर आदींसह बचत गटांच्या महिला व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# कालिवलीत रामनवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील कालिवली येथे रामनवमी निमित्ताने राम, लक्ष्मण, सिता, हनुमान मंदिर, काळीवली येथे हभप पांडुरंग महाराज कचरे यांच्या कृपाशिर्वादाने हभप वामन महाराज भोईर, हभप मारुती महाराज पाटील, हभप विशाल महाराज गावंड, नथुराम पाटील, राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह साजरा करण्यात आला.

यावेळी बुधवारी सायंकाळी उशिरा दिपोत्सवाच्या कार्यक्रम अगोदर कालिवली गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या सप्ताहाचा समारोप गुरुवार दि.२६ रोजी रामजन्माचे किर्तनाने करण्यात आला. येथे तीन दिवस कळशपुजन, ध्वजपुजन, विचा पुजन, मृदंगपुजन, तुळस पुजन, ग्रंथ पुजन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन आदी कार्यक्रम पार पडले. या हरिनाम सप्ताहात चावणे पंचक्रोशीसह रसायनी पाताळगंगा परिसरातील नागरिकांनी उपस्थिती दाखवली.

# स्वराज पाटीलचा धरमतर ते गेटवे जलप्रवास


## वयाच्या १२व्या वर्षी पार केला सागरी टप्पा

**उरण : बातमीदार**

जिद्द, चिकाटी आणि अंगात असलेल्या उपजत जलतरण कौशल्याच्या जोरावर उरणच्या स्वराज सोनाली संतोष पाटील या तरुण जलतरणपटूने अरबी समुद्रात एक नवा इतिहास रचला आहे.

स्वराजने मध्यरात्री बरोबर २ वाजता धर्मतर जेटीवरून समुद्रात उडी मारून आपल्या या आव्हानात्मक मोहिमेला सुरुवात केली. अथांग समुद्राच्या गडद अंधारात आणि लाटांशी झुंज देत स्वराजने धर्मतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किलोमीटरचे अंतर केवळ ९ तास ४९ मिनिटांत यशस्वीपणे पार केले.

स्वराजसाठी 'धर्मतर ते गेटवे'



ही मोहीम अचानक मिळालेले यश नाही, तर त्यामागे त्याची टप्प्याटप्प्याने केलेली तयारी आहे. याआधी त्याने 'मोरा ते गेटवे ऑफ इंडिया' हे अंतर यशस्वीपणे पोहून पार केले होते. त्यानंतर त्याने 'कासा खडक ते खांदेरी किल्ला' या ऐतिहासिक जलमार्गावरही आपली मोहोर उमटवली होती. या लहान पण आव्हानात्मक मोहिमांमधील यशामुळेच त्याला ३६ किमीच्या या महा-मोहिमेसाठी आत्मविश्वास मिळाला होता.

धर्मतर ते गेटवे हा समुद्री मार्ग जलतरणपटूंसाठी अत्यंत कठीण मानला जातो. मध्यरात्री २ वाजता सुरू झालेल्या या मोहिमेत सुरुवातीचे काही तास स्वराजला पूर्णतः अंधारात पोहावे लागले. वाटेत येणारे भरती-ओहोटीचे प्रवाह, जेलीफिशचा धोका आणि मोठ्या जहाजांची वर्दळ या सर्वांवर मात करत स्वराजने सातत्य राखले. प्रशिक्षक मामा हितेश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या कठोर सरावाचे फळ आज स्वराजला मिळाले आहे.

# मुरूड एकदरा येथे रामनवमी उत्साहात



## ■ ६३ वर्षांची परंपरा कायम; भाविकांची अलोट गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड एकदरा महादेव कोळी समाज व महिला मंडळ, मुंबई रहिवासी व धनुर्धारी मंडळ आयोजित रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या उत्सवास ६३ वर्षांची परंपरा आहे.

रामनवमीनिमित्ताने गावकरी सर्व हेवेदावे विसरून सकाळपासून रामाच्या मंदिरात जमतात. सकाळी १० वाजता हभप परशुराम गोपाळ उपाध्ये बुवांचे कीर्तन सुरू झाले. १२.३० वाजता श्रीराम जन्मकाळ होताना सुमारे दोन हजार गावकरी व मुरुडकर मंदिरात उपस्थित होते. बुवांचे कीर्तन सुरू असतानाच श्री रामाच्या मूर्तीचे पूजन चालू होते आणि जन्मवेळ येताच उपस्थित भाविकांनी पुष्पवृष्टी केली.

यंदाच्या पूजेचा मान युवा कार्यकर्ते चिंतामणी गणेश लोदी व दिनेश पाटील यांना मिळाला . उत्सवास पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे आणि सहकारी यांनी उपस्थिती लावली. आलेल्या भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.

सायंकाळी गावकऱ्यांनी रामायण व महाभारत कथेचे देखावे, रामरथ यात्रा व युद्ध देखावा साकारला. दरवर्षी विविध रूपे साकारून भव्य मिरवणूक काढली जाते. ही मिरवणूक मुरुड बाजारात येते व बाजाराच्या नाक्यावर हजारो मुरुडकरांच्या साक्षीने शौर्याचे खेळ दांडपट्टा, तलवारबाजी, कुस्ती, उंच उडी असे सादर होतात. पूर्वी ढोल, ताशा अशी वाद्य असत. आता डीजे असतो. रामनवमीनिमित्ताने एकदरा गावातील व मुरूडच्या बोटी मासेमारी बंद ठेवतात. अशा प्रकारे एकदरा कोळी बांधवांतर्फे पारंपरिक पद्धतीने श्रीरामोत्सव साजरा करण्यात आला.

# खालापुरातील आठ ग्रामपंचायतींना माझी वसुंधरा पुरस्कार प्रदान

**खोपोली : प्रतिनिधी**




माझी वसुंधरा उपक्रमात खालापूर तालुक्यातील आठ ग्रामपंचायतींना साडेपाच कोटींच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. या उपक्रमात खालापूर हा राज्यात सर्वात जास्त पुरस्कार प्राप्त करणारा तालुका ठरला आहे.

शासनाच्या माझी वसुंधरा उपक्रम ५.०साठी खालापूर तालुक्यातील चौक, तांबाटी, नारंगी, वडवळ, वासांबे, तुपगाव या ग्रामपंचायतींनी कोकण विभागात राज्यात चांगली कामगिरी करत ५० लाख रकमेचे पुरस्कार प्राप्त केला होता.

महाराष्ट्रातील एकमेव खालापूर तालुक्यातील सर्वाधिक आठ ग्रामपंचायतींना नऊ पुरस्कार मिळाले. अलिबाग येथे पुरस्कार स्वीकारण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, गटविकास अधिकारी संदीप कराड, ग्रामसेवक उपस्थित होते.

# रजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील यांची भाएसो विद्या संकुलास सदिच्छा भेट

**नागोठणे : बातमीदार**


रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी नागोठणेजवळील वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलास नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विविध अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती घेतली आणि विद्यार्थ्यांना नोकरीयोग्य शिक्षण देण्याच्या भाएसोच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

दरम्यान, 'भाएसो'चे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांनी पाटील यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पाटील यांच्या समवेत त्यांचे पुत्र अमित पाटील उपस्थित होते.

# मुरूड तालुक्यात सहा ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील एकदरा, राजपुरी, चोरढे, वेळस्ते, काशीद, मांडला या सहा ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. एप्रिल महिन्यात ही पोटनिवडणूक होणार असून त्यानंतर ज्या ग्रामपंचायतींचा पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे त्या ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक मे महिन्यात होणार आहे. सध्या पोटनिवडणूक कार्यक्रम लागला असून ज्यांचे काही कारणास्तव सदस्य



पद रद्द झाले आहे किंवा अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर करू न शकणारे उमेदवार यांच्या रिक्त जागा झालेल्या आहेत त्या ठिकाणी ७ ते १३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक प्रक्रिया सुरू होणार आहे. आवश्यकता भासल्यास २८ एप्रिल रोजी मतदान आणि २९ रोजी मतदान होईल, अशी माहिती मुरूड तहसील कार्यालय येथून देण्यात आली.

एकदरा ग्रामपंचायतीमध्ये सहा सदस्यांची पोटनिवडणूक होणार असून येथे सर्व अनुसूचित जमातीसाठीच्या जागा आहेत. राजपुरी ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जमातीच्या तीन जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. चोरढे ग्रामपंचायतीमध्ये दोन जागा असून त्या अनुसूचित जमातीसाठीच्या आहेत. वेळस्तेमध्ये सर्वसाधारण स्त्रीसाठी एक जागा आहे. काशीद ग्रामपंचायतीमध्ये सर्वसाधारण एक व नागरिकांचा मागास प्रवर्ग यासाठी एक जागा आहे. मांडला ग्रामपंचायतीमध्ये सर्वसाधारण अशी एक जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे. पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत.

# रोहा अष्टमीतील वरचा मोहल्ल्यात कमी दाबाने पाणी; नगराध्यक्ष वनश्री शेडगेंना नागरिकांचे निवेदन

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील वरचा मोहल्ला अष्टमी या भागात कमी दाबाने पाणी येत आहे. त्यामुळे तेथील नागरिकांनी नागराध्यक्ष वनश्री शेडगे यांची भेट घेत आपल्या समस्या मांडल्या व निवेदन देण्यात आले.

निवेदन देण्यासाठी नागरिकांसह मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या. अष्टमी येथे पाणी खेचून घेण्यासाठी पंप लावत असल्याने हा प्रश्न उद्भवत असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी सभापती राजेंद्र जैन, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगर परिषदेचे अधिकारी ओंकार भुरण आदी उपस्थित होते.



नगराध्यक्ष शेडगे यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाण्याच्या प्रश्नासंदर्भात माहिती घेणार असून आपल्याला उद्भवत असलेल्या समस्या तातडीने सोडण्यासाठी उपाययोजना करणार असल्याचे नागरिकांना आश्वासन दिले आहे.

नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या सूचनेनंतर सभापती राजेंद्र जैन व नगर परिषद अधिकारी ओंकार भुरण यांनी ताबडतोब या घटनेची दखल घेत लगेच हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# खोपोलीजवळ लेझीम पथकाच्या बसला अपघात

### १० जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर खोपोली एक्झिट मिळ ठाकूरवाडीजवळ तीव्र उतारावर खासगी बसचा ब्रेक फेल झाला व तिने समोरील ट्रकला पाठीमागून धडक दिली. या अपघातात बसचालकासह १० जण किरकोळ जखमी झाले आहेत.

जेएनपेटीट टेक्निकल हायस्कूल कोरेगाव पार्क पुणे येथील हे विद्यार्थी ॲडलॅब इमॅजिका पार्क येथे जात असताना हा अपघात घडला. जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचार करून अन्य दुसऱ्या बसने पुणे येथे सोडून देण्यात आले. बसमध्ये एकूण ३० जण प्रवास करत होते. सर्व प्रवासी पुणे येथील कोरेगाव पार्क येथील चंचल ढोल पथकाचे कलाकार आहेत. जखमींमध्ये पाच अल्पवयीन मुली व मुलांचा समावेश आहे



# ओम श्री करकरणी आई उत्सव सोहळा

**पाली : प्रतिनिधी**

डोंगराच्या कुशीत निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या झोतीरपाडा, रिलायन्स टाऊनशिप गेटसमोरील श्री करकरणी मंदिरात सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील भव्य उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा उत्सव ग्रामस्थ मंडळ झोतिरपाडा व पंचक्रोशी यांच्या सलोख्याने अत्यंत उत्साही व धार्मिक वातावरणात पार पडला.



उत्सवानिमित्ताने विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसराची सजावट करण्यात आली होती, तर भव्य यात्रा भरली होती.

यावेळी रायगड जिल्ह्यासह राज्यभरातून भाविक भक्तगण दाखल होऊन त्यांनी दर्शन घेतले.

# शिवसेनेच्या सुधागड तालुका प्रमुखपदी अनुपम कुलकर्णी

**पाली** : शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या वतीने सुधागड तालुक्यात संघटनात्मक फेरबदल करण्यात आले आहेत. यामध्ये तालुकाप्रमुखपदी अनुपम कुलकर्णी यांची, तर तालुका संपर्कप्रमुखपदी सुरज शेळके यांची नुकतीच अधिकृत नियुक्ती झाली आहे.

अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी आणि शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी यांच्या हस्ते या निवडीचे नियुक्तीपत्र दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले.

नवनियुक्त तालुकाप्रमुख अनुपम कुलकर्णी म्हणाले की, सर्वसामान्य शिवसैनिकांना सोबत घेऊन विकासकामे तळागाळापर्यंत पोहोचवणे हेच माझे प्राथमिक ध्येय असेल. संपर्कप्रमुख सुरज शेळके यांनी सांगितले की, पक्ष आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करताना, शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रत्येक नागरिकांपर्यंत कशा पोहचतील याकडे माझा विशेष कल राहील.

# एकदरा येथे सभामंडपाचे लोकार्पण



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराजवळ असणाऱ्या एकदरा गावातील श्रीराम मंदिरातील सभामंडपाचे लोकार्पण जिल्हा परिषद सदस्य व शिवसेना नेते विघ्नेश माळी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या शिफारशीने १५ लाख रुपये खर्च या सभामंडपासाठी करण्यात आला आहे.

या लोकार्पण कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, बांधकाम विभाग तालुकाप्रमुख दिनेश मिणमिने, सरपंच ज्योती वाघरे, सरपंच शरद खेडेकर, तालुका उपप्रमुख मनोज कमाने चेरमन पांडुरंग आगरकर, चिंतामणी लोदी, ध्रुव लोदी, जगन वाघरे, पंचायत समिती सदस्य गणेश नाक्ती, योगेश जयस्वाल, कॉन्ट्रॅक्टर रूपेश जामदार, चिंतामणी आगरकर, हरिश्चंद्र आगरकर, सदस्य चंद्रा वाघरे, शर्मिला वाघरे आदी उपस्थित होते.

यावेळी आपल्या भाषणात जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी यांनी सांगितले की, शिवसेनेसोबत राहिल्यास एकदरा ग्रामपंचायतीस कोणताही निधी कमी पडू देणार नाही. श्रीराम मंदिराच्या सुशोभीकरणासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मोठा निधी देणार आहे. आमदार महेंद्र दळवी यांनी ग्रॉइन्स बंधारा मंजूर केला आहे. पवित्र धर्मस्थळ गायमुख येथे विकासात्मक बद्दल घडवून आणून त्याचासुद्धा विकास होणार आहे.

याशिवाय सर्वात जुना एकदरा पूल नवीन बांधण्यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार चेअरमन पांडुरंग आगरकर यांनी व्यक्त केले.

# 'कायदा व सुव्यवस्था राखून सण-उत्सव साजरे करा'

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरात येत्या ३ ते ५ एप्रिलदरम्यान ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता पालखी सोहळा, ५ व ६ एप्रिल रोजी हजरत मिरा मोहद्दीन शाह बाबा उरूस उत्सव तसेच रामनवमीनंतर हनुमान जयंती असे सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होणार आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखून, शांततेत व गुण्यागोविंदाने सण-उत्सव साजरे करावेत, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी केले.

नागोठणे पोलीस ठाण्यातर्फे येथील प्रांगणात शांतता समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, महिला दक्षता समिती सदस्य,



पोलीस पाटील, पत्रकार तसेच श्री जोगेश्वरी माता पालखी कमिटी व उरूस उत्सव कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना सहाय्यक निरीक्षक कुलकर्णी बोलत होते.

या बैठकीला श्री जोगेश्वरी माता उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, उपाध्यक्ष संतोष चितळकर, सचिव विवेक देशपांडे, सहसचिव अनिल पवार, सहखजिनदार सतीश पाटील तसेच मिरा मोहद्दीन शाह बाबा उरूस उत्सव समितीचे अध्यक्ष काझीम पानसरे, सिराज पानसरे, असिफ मुल्ला, ज्ञानेश्वर साळुंखे, मंदार चितळे यांच्यासह महिला दक्षता समितीच्या कल्पना टके, नंदा गायकवाड, शबाना मुल्ला, निलोफर पानसरे, अपर्णा सुटे, संगीता पोलसानी, कांचन शेळके तसेच दिगंबर खराडे, बाबा मुल्ला, राजेंद्र गुरव, हुसेन पठाण, मुजफ्फर कडवेकर, गुड्डी पोत्रिक, पोलीस हवालदार स्वप्नील भालेकर, अथर्व पाटील आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सपोनि कुलकर्णी यांनी नागरिकांना महत्त्वाच्या सूचना देताना सांगितले की, कुठल्याही अफवा किंवा सोशल मीडियावरील मेसेजवर विश्वास ठेवू नका, आधी खातरजमा करा. समाजात असंतोष निर्माण होईल असे कोणतेही आक्षेपार्ह संदेश टाकू नयेत. उरूस, उत्सवासाठी अधिकाधिक स्वयंसेवक नेमावेत तसेच ड्रिंक अँड ड्राईव्ह केल्यास १० हजार रुपये दंड आकारला जाईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

उरूस दरम्यान रिलायन्स चौक व दर्गा परिसरात नागरिक मदत केंद्र उभारण्यात येणार असून कोणतीही अडचण आल्यास तेथे संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीस उपस्थित राहिलेल्यांचे आभार हवालदार स्वप्नील भालेकर यांनी मानले.

## माही तेलंगेचे प्रज्ञाशोध परीक्षेत यश

**रोहा : प्रतिनिधी**

गुरुकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड, ता. रोहा येथे झाली होती. या परीक्षेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनगाव येथे इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेत असलेली कुमारी माही गणेश तेलंगे हिने उज्वल यश प्राप्त केले आहे.

माहीने पेपर क्रमांक एक भाषा व गणितमध्ये १२८/१५० गुण व पेपर क्रमांक दोन इंग्रजी व बुद्धिमत्ता ९८/१५० गुण असे एकूण २२६/३०० गुणांनी ७५.३३ टक्के मिळून रायगड जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकाविला, तर राज्यात ती ३३व्या क्रमांकावर राहिली.

माहीच्या या यशात पालक, सोनगाव शाळेतील वर्गशिक्षक तथा रायगड जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त ब्रिजेश भादेकर, मुख्याध्यापक संतोष धोत्रे यांचा मोलाचा वाटा आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून माहीचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## कर्जतमध्ये सहा जागांसाठी पोटनिवडणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमधील सदस्यपदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी पोटनिवडणूक होत आहे. याकरिता सहा जागांसाठी २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

तालुक्यातील आंभेरपाडा प्रभाग क्रमांक ३, पाली तर्फे कोथळ खलाटी प्रभाग क्रमांक १, २, ३, गौरकामत प्रभाग क्रमांक २ आणि दहिवली तर्फ वरेडी प्रभाग



क्रमांक ४ अशा सहा जागांसाठी पोटनिवडणूक होत आहेत. या जागांमध्ये सर्वसाधारण तसेच अनुसूचित जमाती (महिला) यांचा समावेश आहे.

निवडणुक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र ७ ते १४ एप्रिलदरम्यान दाखल करण्यात येणार आहेत. १५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी होईल. १७ एप्रिल ही अर्ज मागे घेण्याची मुदत देण्यात आली असून त्याच दिवशी निवडणूक चिन्हाचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर मतदान २८ एप्रिल रोजी व मतमोजणी २९ रोजी होईल. पोटनिवडणुकीसाठी प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिली.

# टीम इंडियाचे मेगा शेड्युल जाहीर

## १७ शहरांमध्ये खेळवले जाणार २२ सामने

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टीम इंडियाच्या २०२६-२७च्या आंतरराष्ट्रीय घरगुती हंगामाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. येणाऱ्या आगामी हंगामात वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वे आणि ऑस्ट्रेलिया हे चार संघ विविध स्वरूपातील मालिकांसाठी भारताचा दौरा करणार आहेत. यामुळे देशभरातील चाहत्यांना क्रिकेटचा थरार अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

२०२६-२७च्या आंतरराष्ट्रीय घरगुती हंगामात १७ शहरांमध्ये एकूण २२ सामने खेळवले जाणार आहेत. भारताच्या घरगुती हंगामाची सुरुवात २७ सप्टेंबरपासून वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेने होईल.



### बॉर्डर-गावसकर ट्रॉफी मुख्य आकर्षण

या हंगामाचा समारोप अत्यंत प्रतिष्ठेच्या 'बॉर्डर-गावसकर ट्रॉफी'ने होईल. ऑस्ट्रेलियाविरुद्धची ही पाच सामन्यांची कसोटी मालिका २१ जानेवारी २०२७पासून नागपूर येथे सुरू होईल. त्यानंतर उर्वरित सामने चेन्नई, गुवाहाटी, रांची आणि अहमदाबाद येथे खेळवले जातील.

या दौऱ्यात तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामन्यांचा समावेश आहे. एकदिवसीय सामने तिरुवनंतपुरम, गुवाहाटी आणि न्यू चंदीगड येथे होतील, तर टी-२० सामने लखनऊ, रांची, इंदूर, हैदराबाद आणि बंगळुरू येथे खेळवले जातील.

यानंतर डिसेंबर २०२६ मध्ये श्रीलंका संघ भारत दौऱ्यावर येईल. या मालिकेत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामने खेळवले जातील. दिल्ली, बंगळुरू आणि अहमदाबाद येथे एकदिवसीय सामने होतील, तर राजकोट, कटक आणि पुणे येथे टी-२० सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

२०२७च्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात झिम्बाब्वेचा संघ तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतात येईल. हे सामने कोलकाता, हैदराबाद आणि मुंबई येथे खेळवले जातील, जे नवीन वर्षातील आंतरराष्ट्रीय क्रिकेटची सुरुवात करतील.

# आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जगातील सर्वात लोकप्रिय क्रिकेट लीग असलेल्या आयपीएलच्या १९व्या हंगामाबाबत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. यंदा आयपीएलचा उद्घाटन सोहळा आयोजित केला जाणार नाही, असे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गेल्या वर्षी पहिल्यांदाच आयपीएलच्या ट्रॉफीवर नाव कोरल्यानंतर संघाच्या व्हिक्ट्री परेडदरम्यान बंगळुरूमध्ये झालेल्या भीषण चेंगराचेंगरीमध्ये ११ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले. याच दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी दिलेल्या एका मुलाखतीत या निर्णयामागचे कारण स्पष्ट केले. गेल्या वर्षी आरसीबीच्या पहिल्या विजेतेपदाच्या जल्लोषादरम्यान बंगळुरूमध्ये भीषण चेंगराचेंगरी झाली होती, ज्यामध्ये ११ निष्पाप चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला होता. या दुर्दैवी घटनेत प्राण गमावलेल्या चाहत्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी यंदा बोर्डाने उद्घाटन सोहळा टाळण्याचा निर्णय घेतला आहे.




२८ मार्च रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सलामीची लढत होणार आहे. या सामन्यापूर्वी कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम होणार नाही, मात्र क्रिकेटप्रेमींना ३१ मे रोजी होणाऱ्या भव्य समारोप सोहळ्याची मेजवानी मिळणार आहे. गेल्या वर्षी ईडन गार्डन्सवर शाहरुख खान आणि श्रेया घोषाल यांच्या सादरीकरणाने रंगत आणली होती, तसाच काहीसा दिमाखदार सोहळा यंदाही अपेक्षित आहे.

# क्लासिक पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय स्पर्धेत अमृता भगतला रौप्यपदक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाटकमधील मंगळुरू येथे दिनांक २४ ते २८ मार्च या कालावधीत सीनियर पुरुष व महिला क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत महिलांच्या ४७ किलो वजनी गटामध्ये रायगडच्या अमृता ज्ञानेश्वर भगत या खेळाडूने ३२७.५ किलोग्राम वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेड लिफ्ट या प्रकारात उचलून द्वितीय क्रमांक प्राप्त करून रौप्यपदक जिंकले.

स्कॉट या प्रकारातसुद्धा द्वितीय क्रमांक आणि डेड लिफ्ट या प्रकारात अमृताने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यासह तिने या स्पर्धेत एकूण तीन रौप्यपदकांची कमाई केली. अमृताला पॉवर हाऊस क्लबचे विक्रांत अनिल गायकवाड (खोपोली) यांचे मार्गदर्शन लाभले.

अमृताच्या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल, सदस्य मानस कुंटे, सुभाष टेंबे, संदीप पाटकर, ज्येष्ठ खेळाडू माधव गोविंद पंडित आणि सचिव अरुण पाटकर यांनी आनंद व्यक्त करून अमृता भगत आणि विक्रांत गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आणि आंतरराष्ट्रीय पंच संजय सरदेसाई यांनीसुद्धा तिचे अभिनंदन केले आणि महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या अशा कामगिरीमुळेच राज्याला राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक विजेतेपद, उपविजेतेपद मिळणे शक्य होते, असे मत व्यक्त केले.



# शनिराज हारगेचे खो-खो स्पर्धेत यश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमध्ये दुसरी अखिल भारतीय पोलीस क्रीडा क्लस्टर स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेतील खो-खो क्रीडा प्रकारात महाराष्ट्र राज्य पोलीस दलाकडून खेळताना रायगड जिल्हा पोलीस दलातील शिपाई शनिराज हारगे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक मिळवून दिला.

या यशाबद्दल शनिराज हारगे यांचा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सत्कार केला. हारगे यांना हवालदार ऋषिकेश साखरकर (स्पोर्ट्स इन्चार्ज, रायगड) यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले.

# श्रद्धांजली चषक क्रिकेट स्पर्धेत पेण संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धांजली चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत पेण स्पोर्ट्स असोसिएशनच्या संघाने स्पर्धेत विजेता होण्याचा मान मिळवला. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पेण संघाने अथर्व इलेव्हन संघाचा ४८ धावांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले.

पेणच्या क्रिकेट इतिहासातील अजरामर झालेल्या खेळाडूंच्या स्मरणार्थ श्रद्धांजली चषकाचे आयोजन करण्यात येते. १२ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १६ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना पेण स्पोर्ट्स अससोसिएशन विरुद्ध अथर्व इलेव्हन संघात रंगला. पेण संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात सात गड्यांच्या मोबदल्यात १७३ धावा केल्या. यामध्ये प्रतीक म्हात्रे याने सर्वाधिक ५२ धावा काढल्या, तर योगेश पवार २४, शेखर भगत २३, हृषिकेश नाईक २० यांनीही योगदान संघाला दिले. अथर्व संघाकडून नरेश सावंतने तीन गडी बाद केले.




प्रत्युत्तरात अथर्व इलेव्हन संघ १२५ धावांमध्ये गारद झाला. त्यांच्याकडून ओमकार हरपाल याने सात चौकार आणि पाच षटकारांच्या सहाय्याने ४० चेंडूत ७३ धावांची दमदार खेळी केली, पण संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. पेण संघाकडून रिषभ शर्मा याने पाच, तर ओम कांबळे आणि अभिषेक खातू यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

रिषभला अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत १४६ धावा करणारा अलिबाग संघाचा कर्णधार ऋषिकेश राऊतला उत्कृष्ट फलंदाज, पेण संघाचा अष्टपैलू खेळाडू देवांश तांडेलला उत्कृष्ट गोलंदाज, तर संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा सुयश भट ज्याने स्पर्धेत १२५ धावा व सात बळी घेतले त्याला मालिकावीर म्हणून सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उद्योजक अतुल वनगे, राजू पिचिका उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्यांनी घेतले.

# न्यूझीलंडच्या अमिलिया केरने रचला नवा इतिहास

■ सर्वाधिक वेळा ३०पेक्षा अधिक धावा करणारी पहिली बॅटर



**क्राइस्टचर्च : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडची स्टार ऑलराउंडर अमिलिया केर हिने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. क्राइस्टचर्चच्या हेगले ओवलच्या मैदानात रंगलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाचव्या टी-२० सामन्यात अमेलियाने अवघ्या ५५ चेंडूत १०५ धावांची वादळी खेळी साकारली. या खेळीसह तिने संघाला विजय मिळवून दिलाच, याशिवाय क्रिकेट जगतातील अनेक दिग्गजांना मागे टाकत अविश्वसनीय विक्रमाला गवसणी घातली.

अमिलिया केर आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (पुरुष आणि महिला दोन्ही गटात) सर्वाधिक वेळा ३०पेक्षा अधिक धावा करणारी बॅटर ठरली आहे. सलग ११ डावातील दमदार कामगिरीसह तिने या खास विक्रमाला गवसणी घातली. तिने महिला क्रिकेटमध्ये श्रीलंकेची चमारी अटापट्टू आणि रोमानिया रेबेका ब्लेक (नऊ वेळा) यांचा विक्रम मोडीत काढला. पुरुष क्रिकेटमध्ये रोहित शर्मा, मोहम्मद रिझवान आणि अभिषेक शर्मा (सात वेळा बार) या तिघांना तिने मागे टाकले आहे.

सध्याच्या घडीला अमिलिया सातत्यपूर्ण कामगिरी करताना दिसत आहे. मागील ११ डावात तिने १४०पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटसह एकूण ६६९ धावा केल्या आहेत. या दरम्यान तिने दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वेसारख्या संघासमोर दमदार कामगिरी करताना तिने दोन शतके ठोकली आहेत. याशिवाय गोलंदाजीत तिने १२ विकेट्स घेतल्या आहेत. नुकतेच तिने महिला आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये एक हजार धावा आणि शंभर विकेट्सचा खास डाव साधला होता.

पाचव्या व अखेरच्या सामन्यात अमेलियाच्या शतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडच्या संघाने आफ्रिकेला पराभूत करत मालिका ४-१ने जिंकली.

# युनियन क्रिकेट अकॅडमीतर्फे निवड चाचणी

**ठाणे : प्रतिनिधी**

कल्याण येथे युनियन क्रिकेट अकॅडमीतर्फे मुलींसाठी ओपन एज निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले असून इच्छुक महिला क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा दाखवण्याची आणि नॉकआउट स्पर्धेसाठी संघात स्थान मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या निवड चाचण्या २७ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत पार पडतील. महिला क्रिकेटला प्रोत्साहन देणे आणि नवोदित खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. निवड झालेल्या खेळाडूंना आगामी नॉकआउट स्पर्धेत अकॅडमीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल.

अकॅडमीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, महिला क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांना पुढे जाण्यासाठी योग्य संधी देणे हा आमचा उद्देश आहे. इच्छुक खेळाडूंनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ९९६७७५६७८८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अष्टपैलू हर्षित राणाच्या जागी नवदीप सैनीला 'केकेआर'मध्ये संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगाम लवकरच सुरू होणार असून संघातील महत्त्वाच्या खेळाडूंना झालेल्या दुखापतींमुळे अनेक फ्रँचायझींना धक्का बसला आहे. कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाने २५ मार्चला हर्षित राणाच्या रिप्लेसमेंटची घोषणा केली. अष्टपैलू खेळाडूच्या जागी शाहरूख खानच्या सहमालकीच्या संघाने भारताच्या नवदीप सैनीला आपल्या संघात सहभागी करून घेतले आहे. दुसरीकडे शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायन्सच्या संघाने कुलवंत खेजरोलिया याला पृथ्वी राज याराच्या जागी बदली खेळाडूच्या रूपात संघात घेतले आहे.

कोलकाता नाईट रायडर्सला यंदाच्या हंगामाआधी सर्वाधिक फटका बसल्याचे पहायला मिळाले. आकाश दीप, मुस्तफिजुर रहमान आणि हर्षित राणा या तिघांच्या जागी संघाला बदली खेळाडूचा संघात समावेश करण्याची वेळ आली. चेन्नई सुपर किंग्स, दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स या संघांनाही त्यांच्या मुख्य संघातील प्रमुख खेळाडूंची उणीव भासण्याची शक्यता आहे.




गेल्या वर्षी मुंबई इंडियन्सने कॉर्बिन बॉशची निवड केल्यानंतर अनेक संघांनी अशा बदली खेळाडूंची निवड केली आहे, ज्यांचे यापूर्वी पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळण्यासाठी करार होते. यात स्पेन्सर जॉन्सन, ब्लेसिंग मुझारबानी आणि दसुन शनाका या परदेशी खेळाडूंनी पाकिस्तान सुपर लीग सोडून आयपीएलला पसंती दिल्याचे पहायला मिळाले.

# स्टोइनिस, कॉनोली मोहालीत दाखल



**चंदीगड : वृत्तसंस्था**

अवघ्या दोन दिवसांच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या आयपीएल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पंजाब किंग्जचा संघ आता पूर्ण ताकदीनिशी सज्ज झाला आहे. ऑस्ट्रेलियाचे धडाकेबाज अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टोइनिस आणि युवा तुफान कूपर कॉनोली बुधवारी मोहालीत दाखल झाले. न्यू चंदीगड येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर या दोन्ही खेळाडूंचे स्वागत करण्यात आले.

गेल्या हंगामात विजेतेपदाच्या उंबरठ्यावरून परतलेल्या पंजाब किंग्जने यंदा कोणतीही कसर सोडलेली नाही. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील या संघाने गेल्या काही आठवड्यांपासून सराव सत्रात बरीच मेहनत घेतली आहे. ३१ मार्च रोजी पंजाबचा सामना घरच्या मैदानावर गुजरात जायंटस्‌विरुद्ध होणार आहे.

यापूर्वी मागील आयपीएल फायनलमध्ये पंजाब किंग्जला आरसीबीविरुद्ध अवघ्या सहा धावांनी पराभव पत्करावा लागला होता. आरसीबीने दिलेल्या १९१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना शशांक सिंगने ३० चेंडूंत ६१ धावांची झंझावाती खेळी साकारली, मात्र यानंतरही हा संघ जेतेपद मिळवण्यात अपयशी ठरला होता. यंदा स्टोइनिससारख्या अनुभवी फिनिशरच्या समावेशानंतर हा संघ पुन्हा एकदा ट्रॉफीवर नाव कोरण्यासाठी जोमाने मैदानात उतरणे अपेक्षित आहे.

# फुटबॉलपटू मोहम्मद सलाह नऊ वर्षांनंतर सोडणार लिव्हरपूलची साथ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इजिप्शियन फुटबॉलचा दिग्गज फुटबॉलपटू मोहम्मद सलाहने लिव्हरपूल फुटबॉल क्लब सोडण्याची घोषणा केली आहे. लिव्हरपूलसोबतचा त्याचा करार या हंगामाच्या अखेरीस संपत आहे. त्याचा करार नूतनीकरण केला जाणार नाही. क्लबने ही घोषणा त्याच्या स्वतःच्या घोषणेसोबतच केली आहे.

मोहम्मद सलाहने ही माहिती सोशल मीडियाद्वारे दिली. एका भावनिक व्हिडीओ संदेशात त्याने म्हटले की, ही बातमी त्याच्या चाहत्यांनी थेट त्याच्याकडून ऐकावी अशी त्याची इच्छा आहे. त्याने याला त्याच्या निरोपाचा पहिला भाग म्हटले असून भविष्यात आणखी निरोपाचे संदेश येऊ शकतात असे संकेत दिले आहेत.



सलाह आणि लिव्हरपूल यांच्यातील वाद डिसेंबर २०२५मध्ये सुरू झाला. सालाहने व्यवस्थापक आर्ने स्लॉट यांच्यावर थेट गंभीर आरोप केले. सालाहने दावा केला की, त्याला अंतिम ११ खेळाडूंमध्ये संधी न देऊन क्लबने त्याचा अपमान केला, जणू काही त्याला बळीचा बकरा बनवण्यात आले होते. सलग तीन सामन्यांसाठी सालाहला बेंचवर बसवल्यानंतर हे विधान आले होते. आपल्या योगदानाचे योग्य मूल्यमापन होत नसल्याची त्याने तक्रार केली, ज्यामुळे संघात आणि सार्वजनिकरित्या तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आणि याचा परिणाम संघाच्या मनोधैर्यावरही झाला. या वक्तव्यानंतर सुमारे तीन महिन्यांनी सलाहने क्लब सोडण्याची घोषणा केली. सलाहचे जाणे हा लिव्हरपूलसाठी एक मोठा धक्का आहे.




सौजन्य : विद्याधर जोशी (अध्यक्ष, केळवणे जिल्हा परिषद भाजपा)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com